# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 1 | Issue : 7 | Marathi Monthly | Thane, Monday, 1 January - 2024 to 31 January - 2024 | Pages 16 | Price : 10/-


# नशीब समजा, ते तरुण पाकिस्तानी अतिरेकी नव्हते...


## त्यांचे उपकार माना, ज्यांनी तुमच्या टुकार-भिकार सुरक्षायंत्रणेतली भगदाडं दाखवून दिली...!!!



सर्वप्रथम, २० हजार कोटींचा 'सेंट्रल-व्हिस्टा' प्रकल्प (तथाकथित अमृतकाळात, सगळी ब्रिटीश व मोगल-राजवटीतली नावं बदलली जात असताना, 'सेंट्रल-व्हिस्टा' हे इंग्रजी नाव ठेवलं जातं किंवा गुजराथच्या 'अहमदाबाद'चं नाव बदललं जात नाही, हे विशेषच) बांधणाऱ्या भाजपाई 'वास्तुविशारदा'ला तुरुंगात टाका, ज्याने जेमतेम ६ फूट उंचीवर प्रेक्षक-कक्ष (Visitors' Gallery) उभारला... मग, पुढच्या बाता मारा! ...*(पान क्र. ४ वर)*

# ...तरी, तुमच्या भांडवलशाहीला उदारमतवादी म्हणता?

(६ डिसेंबर, महापरिनिर्वाण-दिन... बाबासाहेबांचा 'समतेचा संदेश', कार्ल मार्क्सप्रणित 'साम्यवाद' आणि गांधी-नेहरु-लोहियांचा 'समाजवाद'... यांना एकाचवेळी तिलांजली देत, अमानुष विषमतेचा व माणुसकीशून्य व्यवहाराचा कहर माजवणाऱ्या 'भांडवलशाही'चं निर्लज्ज-निर्गल प्रतिनिधित्व करणाऱ्या... 'इन्फोसिस'वाल्या नारायणमूर्तींच्या कामगार-कर्मचारीविरोधी फुत्काराचा व सत्यस्थितीचा अपलाप करुन भांडवलशाहीचं आंधळं समर्थन करु पहाणाऱ्या विखारी वक्तव्याचा... 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन 'राजन राजे'कृत रोखठोक व जळजळीत पंचनामा... बघूया, त्यातून हा इन्फोसिसचा 'वाल्या' आणि तत्सम भांडवलदारवर्ग, सुधारुन 'वाल्मिकी' बनतोय का... की, ''भले तरि देऊं कासेची लंगोटी । नाठाळाचे माथी हाणू काठी ।।'', या संत तुकारामांच्या उक्तिनुसार, यांना वठणीवर आणावं लागतं का ते...!!!) ...*(पान क्र. ५ वर)*






अंतरंग



''धनदांडगी भांडवली व्यवस्था ही, मलेरियाच्या जंतूंसारखी!'' पृष्ठ क्र. ८



काश्मीरही बनणार कॉर्पोरेट सुवर्णलंका! ...राजन राजे पृष्ठ क्र. ९



डायबेटिसला गुलाबजाम चांगला की जिलबी? डॉ. रुपेश पाटकर पृष्ठ क्र. ११

महाराष्ट्रातदेखील पेट्रोल व डिझेलचे दर तात्काळ कमी करण्यात यावेत! पृष्ठ क्र. १५

# ठाणे शहरातील अनधिकृत शुभेच्छा फलकधारकांवर दंडात्मक कारवाई करा!

## 'धर्मराज्य पक्षा'ची आयुक्तांकडे मागणी...

**ठाणे :** ठाणे शहरात सांस्कृतिक-सामाजिक संस्था, अराजकीय कार्यक्रम आणि जनजागृती करणाऱ्या फलकांवर तात्काळ कारवाई केली जाते. मात्र, राजकीय पक्षांशी संबंधित असलेल्या फलकांवर कारवाई होताना दिसून येत नसल्याचे सिद्ध झाले आहे. ठाणे महापालिकाक्षेत्रात, प्रशासनाच्या परवानगीने फलक लावण्यासाठी, आकारमानानुसार दर आकारले जातात. असे असतानादेखील शहरातील काही भागांत अनधिकृतपणे शुभेच्छांचे, अभिनंदनाचे, राजकीय मंडळींच्या वाढदिवसांचे फलक राजरोसपणे उभारले जात आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे, दिवाळीला दोन महिने उलटूनदेखील, दीपावली शुभेच्छांचे फलक अजूनही ठाणे शहराच्या काही भागांत दिसून येत आहेत. याच पार्श्वभूमीवर, **'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना पत्रव्यवहार करण्यात येऊन, ठाणे शहरातील अनधिकृत शुभेच्छाफलकधारकांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या फलकबाजीमुळे ठाणे विद्रुप झालेले दिसत असून, एकीकडे राजकीय पक्षांच्या बॅनरबाजीला अभय; तर, दुसरीकडे सांस्कृतिक-सामाजिक संस्था, अराजकीय कार्यक्रम आणि जनजागृती करणाऱ्या फलकांवर तात्काळ कारवाई केली जात असल्याने, ठाणे महानगरपालिकेचा पक्षपातीपणा आणि डोळेझाकपणा यानिमित्ताने उघड होत असल्याची**




**टीका, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.** दरम्यान, शहरातील मुख्य चौक आणि उड्डाणपूल ही ठिकाणे बॅनरबाजीसाठी सोयीस्कर मानली जातात; परंतु, त्याचबरोबर ठाणे शहरात सुरु असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या पिलर्सवरदेखील, अनधिकृतपणे फलक उभारले जात आहेत. आधीच मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामामुळे, ठाण्यात प्रचंड वाहतूककोंडीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यातच बांधकामातून निर्माण होणाऱ्या धुळीमुळे मोठ्याप्रमाणात वायुप्रदूषण होत असल्याने, त्याचा त्रास सर्वसामान्य नागरिक व वाहनधारकांना होत असतो. अशातच मुख्य चौक, उड्डाणपूल आणि मेट्रो प्रकल्पाच्या पिलर्सवर फलकबाजी होत असल्यामुळे, वाहनचालकांची दिशाभूल होऊन गंभीर अपघातांची शक्यता नाकारता येत नाही. बॅनरबाजीच्या माध्यमातून प्रसिद्धीचा हव्यास असणारे 'फलकवीर' मात्र, आपले शहर सुंदर व नीटनेटके दिसावे, अशाप्रकारच्या 'सिध्दी'पासून कोसो मैल दूर आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. याच **पार्श्वभूमीवर, ठाणे महानगरपालिका प्रशासनाच्या संबंधित विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, ६ बाय ८ आकारमानाच्या एका बॅनरसाठी, प्रतिदिन रु. ८ ते १० हजारांचा दर आकाराला जात असल्याचे समजले. असे असतानादेखील, ठाणे शहरात अनधिकृतपणे फलक उभारणाऱ्या बॅनरबहाद्दरांवर, राजकीय वरदहस्त असलयाने, कायद्याचा कोणताही धाक उरलेला नसल्याचेच याद्वारे स्पष्ट होत आहे. याप्रकरणी आयुक्तांनी गांभीर्याने लक्ष घालून, ठाणे शहर विद्रुप करणाऱ्या अनधिकृत शुभेच्छाफलकधारकांवर त्वरित दंडात्मक कारवाई करावी, तसेच असे फलक शोधून, संबंधित बॅनरबाजांकडून फलकाच्या आकारमानानुसार, दरआकारणी करावी, जेणेकरुन ठाणे महानगरपालिकेच्या महसुलात वाढ होऊन, महापालिकेची तिजोरी भक्कम होण्यास सुरुवात होईल, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, अभिजित बांगर यांच्याकडे केली आहे.**

# भविष्यातील तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता,

## ठाणे शहरात नवीन निवासी संकुलांना परवानगी न देण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी...

**ठाणे : गेल्या काही वर्षांत ठाणे शहराची लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढलेली आहे. मुंबईचे धाकटे भावंडं म्हणून ओळखले जाणारे ठाणे, वाढत्या बांधकामांमुळे प्रचंड विस्तारले, शहराचे नागरिकीकरण वेगाने झाले. मात्र, याचा संपूर्ण ताण हा, ठाणे शहरातील मूलभूत सोयीसुविधांवर पडत असल्याचे आता प्रकर्षाने जाणवू लागले आहे. शहरीकरणामुळे, ठाण्यात पाणीटंचाईची समस्या नेहेमीच भेडसावत असते. त्यातच आता, आगामी काळात ४३२ नवीन इमारतींसह, क्लस्टर आणि एसआरए यांसारख्या योजनांमुळे, ठाणे शहरात निवासी व वाणिज्य इमारतींची भर पडणार आहे. राजकीय उदासीनतेमुळे ठाणे महानगरपालिकेची स्वत:ची पाणीयोजना किंवा स्वत:चे धरण नाही. त्यातच वाढत्या नागरिकीकरणामुळे, भविष्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. यासाठी ठाणे शहरातील विहिरींचे पुनरुजीवीकरण होणे अतिशय गरजेचे असल्याची ठाम मागणी 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, महाराष्ट्र राज्याच्या प्रधान सचिवांकडे एक लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. ठाणे शहरातील सर्वाधिक निवासी संकुले घोडबंदर रोड परिसरात असून, या ठिकाणी पाणीटंचाईची समस्या नेहेमीच भेडसावत असते. असे असतानाही, या परिसरात ५०/५० मजल्यांच्या गगनचुंबी इमारतींचे बांधकाम सुरु आहे. या नवीन इमारतींमध्ये राहायला येणाऱ्या हजारो रहिवाशांना पाणी कुठून देणार?** हा मोठा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. दरम्यान, ठाणे शहरात ८०० विहिरींपैकी ५५५ विहिरी शिल्लक असून, त्यापैकी १५० विहिरी जुन्या ठाण्यात आहेत. परिणामी, ठाणे शहरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी, या सर्व विहिरींचे पुनरुज्जीवन होणे आत्यंतिक गरजेचे आहे. याच अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, दि. १४/०३/२०२३ रोजी पत्रव्यवहार (धराप/मनपाआ/ठामपा/ठाणे/२०२३/१७) करण्यात आला होता. त्यावेळी ठाणे शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी, ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. ठाणे शहराला विविध प्राधिकरणाच्या माध्यमातून, ४८५ एमएलडी पाणी वितरित केले जाते. त्यासाठी आतापर्यंत १४५ कोटी रुपयांहून अधिक खर्च महापालिकेला करावा लागलेला आहे. त्यातच पाणीचोरी व पाणीगळती यामुळे पाणीपुरवठ्याचे



नियोजन पूर्णपणे बिघडलेले आहे. याच पार्श्वभूमीवर घोडबंदर रस्त्यावरील निवासी संकुलांवर, दररोज दोन ते तीन टँकर्सद्वारे पाणी मागविण्याची वेळ आलेली असल्याने, त्यासाठी त्यांना दरमहा लाखो रुपयांचा खर्च सहन करावा लागत आहे. **यात टँकरमाफियांकडून रहिवाशांची आर्थिक लूट सुरु आहे. या सर्वांवर एकच पर्याय म्हणजे, ठाणे शहरातील विहिरींचे पुनरुजीवन करण्यात येऊन, त्यातील पाणी पिण्यायोग्य करुन, त्याचा नियमित पुरवठा ठाणेकर नागरिकांना करण्यात यावा. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, प्रचंड नागरिकीकरणामुळे, गेल्या काही वर्षांत ठाणे शहर फोफावले, अक्षरशः उभे-आडवे फुगले आणि त्याचा दुष्परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावर झाला. त्यामुळे भविष्यातील तीव्र पाणीटंचाई टाळण्यासाठी, ठाणे शहरात नवीन निवासी संकुलांना परवानगी देण्यात येऊ नये, अशी आग्रही मागणी 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, राज्याच्या प्रधान सचिवांकडे केली आहे.**

# मुंब्रा-कौसा येथील महापालिका रुग्णालय त्वरित कार्यान्वित करुन, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करा !

## 'धर्मराज्य पक्षा'ची ठाणे महापालिकेच्या आयुक्तांकडे आग्रही मागणी...

**ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील, मुंब्रा येथील कौसा परिसरात उभारण्यात आलेल्या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम, दोन वर्षांपूर्वीच पूर्ण होऊनदेखील, महापालिकेचे हे रुग्णालय अद्याप कार्यान्वित करण्यात न आल्याने, मुंबई उच्च न्यायालयाने, ठाणे महानगरपालिका प्रशासनाच्या उदासीन कारभाराबाबत, खडे बोल सुनावल्याचे वृत्त, प्रसिद्धीमाध्यमांत प्रकाशित झाले होते. त्याचबरोबर, शंभर खाटांचे हे महापालिका रुग्णालय लवकरात लवकर कार्यान्वित करुन, गरजूंना परवडणाऱ्या दरांसंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत?** याची सविस्तर माहिती प्रतिज्ञापत्राद्वारे देण्याचे स्पष्ट आदेशदेखील, मुंबई उच्च न्यायालयाने महापालिकेला दिलेले आहेत. याच पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना पत्र लिहून, मुंब्रा-कौसा येथील महापालिकेचे रुग्णालय त्वरित कार्यान्वित करण्याची आगारही मागणी केली आहे. ठाणे शहरात राहणाऱ्या करदात्या नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे हे, महानगरपालिकेचे आद्यकर्तव्य असताना, रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी दहा वर्षांचा कालावधी लागणे, इमारतीचे बांधकाम दोन वर्षांपूर्वीच पूर्ण होऊनदेखील, रुग्णालय कार्यान्वित होण्यासाठी अमर्याद विलंब लागणे ही बाब, जेवढी सर्वसामान्य जनतेच्या आकलनापलीकडची आहे, तितकीच ती संतापजनकही असल्याची टीका, 'धर्मराज्य पक्षा'चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. दरम्यान, 'असोसिएशन फॉर प्रोटेक्शन ऑफ सिव्हिल राईट्स' या संस्थेने रुग्णालय कार्यान्वित होण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत जनहित याचिका दाखल केली होती. त्याच अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने, ठाणे महानगरपालिकेवर ताशेरे ओढले होते.

**''रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा'' हे वाक्य ऐकायला आणि वाचायला जरी बरे वाटत असले तरी, ठाणे महापालिका प्रशासनाच्या, आरोग्यविषयक तत्परता व गांभीर्याबद्दल यामुळे संकोच निर्माण होण्यास वाव आहे, असेही नितीन देशपांडे यांनी, आपल्या पत्रात नमूद केले आहे. ठाणे शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी, कष्टकरीवर्गाची निम्म्याहून अधिक लोकसंख्या ही, कळवा-मुंब्रा-दिवा या परिसरात आहे. या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या रुग्णांचा भर त्यामुळे आपसूकच छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयावर पडत असतो. त्यावर येथील नागरिकांना वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी, शंभर खाटांचे रुग्णालय बांधण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे ठाणे महापालिका प्रशासनाने. न्यायालयात मान्य केलेले असतानाही, रुग्णालय प्रत्यक्षात कार्यान्वित होण्यासाठी लागणाऱ्या विलंबास नेमके कारण काय? असा थेट प्रश्न देशपांडे यांनी उपस्थित केला आहे.**

एकीकडे मुंब्रा-कौसा येथील कार्यान्वित न झालेले रुग्णालय तर, दुसरीकडे तीस वर्षांपूर्वी सुरु करण्यात आलेले कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, जे सुरु झालेल्या दिवसापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेले आहे. तीन महिन्यांपूर्वी घडलेले कळवा रुग्णालयातील भीषण मृत्युकांड अजूनही ठाणेकर जनता विसरलेली नाही. दरम्यान, मुंब्रा-कौसा येथील महापालिका रुग्णालय जर सद्यस्थितीत सुरु असते तर, आज ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्यसेवेचा जो काही बोजवारा उडालाय आणि दुर्दैवाने, ठाणे शहरातील कष्टकरी-करदाते नागरिक ज्यापद्धतीने आपल्या मूलभूत गरजांपासून वंचित राहत आहेत, ती बाब निश्चितच निंदनीय असून, एकीकडे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाला ३१ वर्षे पूर्ण होऊनही, रुग्णालयाचा कारभार अद्याप सुधारताना दिसत नाही; तर, दुसरीकडे मुंब्रा रुग्णालयाची इमारत पूर्ण होऊन दोन वर्षे उलटूनही, अजूनपर्यंत ती कार्यान्वित केली जात नाही. त्यामुळे प्रशासनाची नेमकी कोणती अडचण आहे? हेच समजत नाही. ऑगस्ट-२०२३ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात शिवाजी रुग्णालयाच्या दुरवस्थेप्रकरणी, **'धर्मराज्य पक्षा'ने पत्रव्यवहार करुन लक्ष वेधलेले असतानाही, ठाणे महापालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले आणि ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात, निष्पाप रुग्णांच्या मृत्युकांडाची 'ती' भीषण दुर्घटना घडली. या घटनेचा चौकशी अहवाल १५ दिवसात येईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलेले असतानादेखील, आजतागात सदर अहवाल सादर झालेला नाही. याचाच अर्थ, ठाणे महानगरपालिका प्रशासनाची असंवेदनशीलता स्पष्टपणे अधोरेखित होत आहे.** तरी, याप्रकरणी आपण गांभीर्याने लक्ष घालून, मुंब्रा-कौसा येथील महापालिकेचे रुग्णालय त्वरित सुरु करावे, त्यासाठी कोणत्याही मुहूर्ताची अथवा राजकीय मान-पान देण्याची वाट न पाहता, रुग्णसेवेची सुविधा सर्वसामान्यांना उपलब्ध करून द्यावी.

त्याचबरोबर, गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्यसेवेचा जो काही बोजवारा उडालेला आहे, त्याबाबत आणि करदात्या ठाणेकर नागरिकांच्या माहितीसाठी म्हणून छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचीदेखील श्वेतपत्रिका काढून, ती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करावी, अशी आग्रही मागणी धर्मराज्य पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना लिहिलेल्या पत्रात ठामपणे अधोरेखित केली आहे.

*पाटण तालुका क्रिकेट असोसिएशन अंतर्गत, आदर्श युवा प्रतिष्ठान-भिलारेवाडी आणि कै. यशवंत केशव भिलारे यांच्या स्मरणार्थ, नवी मुंबईतील दिवा कोळीवाडा क्रीडा मंडळ, ऐरोली येथे 'आई वडजाई चषक-२०२३' या भव्यदिव्य क्रिकेट सामन्यांचे आयोजन शनिवार, दि. २३ डिसेंबर ते रविवार, दि. २४ डिसेंबर-२०२३ या कालावधीत करण्यात आले होते. या स्पर्धेला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. दरम्यान, स्पर्धेचे उद्घाटन करताना, मा. राजन राजे यांनी, छत्रपती शिवाजी महाराज व ग्रामदैवत आई वडजाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर, फलंदाजी करुन जोरदार फटकेबाजी करीत, उपस्थितांचे मन जिंकले. यावेळी ग्रामस्थ मंडळ भिलारेवाडी यांच्या वतीने, मा. राजन राजे यांचे शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक स्वागत करण्यात आले. ही क्रिकेट स्पर्धा यशस्वी होण्यासाठी, एल. जी. हिंग कंपनीचे श्री. लक्ष्मण भिलारे आणि श्री. अंकुश मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.*



## नशीब समजा, ते तरुण पाकिस्तानी अतिरेकी नव्हते... ...(पान क्र. १ वरुन)

**ते तरुण आणि ती तरुणी, कुणी दहशतवादी होते की, आतंकवादी? भले, त्यांचा मार्ग वरकरणी चुकीचा असला व ते निखालस दुःसाहस असलं...तरी, त्याला मनमानी पद्धतीने एवढी गंभीर कलमं लावायची??**

**...कुठल्या घोषणा देत होते ते? 'जय भीम' आणि 'भारत माता की जय' अशाच ना? अशा घोषणा देणारे निःशस्त्र आंदोलक; जर देशद्रोही असतील; तर, यांच्या लेखी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तुम्हीआम्ही, राष्ट्रगीतानंतर 'भारत माता की जय' न चुकता उद्घोष करत भारतमातेवर निरतिशय प्रेम करणारे, सारेच देशद्रोही ठरतो!**

...काय वयं आहेत हो, त्या पोरांची? भगतसिंग तरुण होता, म्हणूनच भडक माथ्याचा होता, तो अमित मालवीयसारखा पन्नाशी ओलांडलेला आणि अर्ध्याहून अधिक लाकडं स्मशानात गेलेला नव्हता. तेव्हा, या 'व्यवस्थे'त भरडून निघालेल्या तरुणाईला, जरा प्रेमाने समजून घ्यायला नको...ते काय कुणाचे जीव घ्यायला निघाले होते की, काय? ते ही, कुठेतरी भगतसिंगासारखेच तारुण्यसुलभ भडक माथ्याचे आहेत ना...देशाची सद्यस्थिती पाहून आतून भडकले असतील, झाला असेल थोडाबहुत उद्रेक...पण, तो काय भाजून काढणारा ज्वालामुखीचा उद्रेक होता की, काय? साधा निर्विष पिवळा धूरच सोडला ना त्यांनी??

...सध्या 'स्वातंत्र्याची दुसरी लढाई' या देशात लढली जात असताना, या नवथर तरुणांची 'भगतसिंगां'शी तुलना करायला, म्हणूनच काही हरकत नसावी.

देशात 'न्याय, सत्यता आणि व्यक्तिस्वातंत्र्या'चा पूर्ण 'संकोच' झाला असताना; ही वाट चुकलेली वैफल्यग्रस्त पोरं, देशातल्या तरुणाईचं 'प्रतिनिधित्व' करतायत...हे बिलकूल विसरुन चालणार नाही. इतर कुठल्या पद्धतीने ते निषेध व्यक्त करणार होते, कुणी सांगावं तरी? आमच्यासारख्या तब्बल चार दशकांहून अधिककाळ समाजकारणात–राजकारणात घालवणार्याला, या देशातली सध्याची 'गोदी–मिडीया' व्यक्त होण्यासाठी, धड 'अवकाश' उपलब्ध करुन देत नसेल, 'राजकीय व सामाजिक बहिष्कृता'चं (खरंतर, 'राजकीय–अस्पृश्यते'चं) जीणं जगणं आम्हाला भाग पाडलं जात असेल...तर, गुजराथ–मारवाडी बापजाद्यांच्या मालकीच्या असलेल्या 'गोदी–मिडीया'तून ही तरुण पोरं, कधि आणि कशी व्यक्त होऊ शकली असती? कुणाला फसवू पहाताय, कुणाची दिशाभूल करताय (कुणीतरी पूर्वी, या गोदी–मिडीयातल्या 'मेंदूविक्या' दलाल पत्रकारांना व त्यांच्या संपादकांना 'प्रेस्टिट्यूट्स्' म्हटल्याचंही, या निमित्ताने आठवलं, हो)??

**''भगतसिंगांना, म. गांधींनी शक्य असूनही वाचवलं नाही'', असा कायमच बेशरम, निखालस खोटा आरोप करणारे संघीय–भाजपाई लोकं, आता नव्या पिढीतल्या, भगतसिंगाच्याच वाटेवर चालणाऱ्यांना, एकप्रकारे फासावर लटकविण्यासाठी आपली पाशवी ताकद वापरत असताना, हा देश पहातोय, हे लक्षात ठेवा.**

'अमित मालवीय पंथीय' लोकांच्या दुर्दैवाने, हा देश जातधर्मीय 'विद्वेषाच्या झापडां'नी अजून पुरता 'आंधळा' झालेला नाही. तेव्हा, सैतानी–सत्तेच्या धुंदीत चाललेला तुमचा नंगानाच, त्यांना खचितच दिसतोय, हे विसरु नका... श्रीकृष्णाच्या 'कर्मसिद्धांता'नुसार त्या महापातकांचा हिशोब, तुम्हाला कधि ना कधि चुकता करावाच लागेल, संघियांनो! आणि, समजा, न द्यावा लागला हिशोब...तर मग ते महाभारतही खोटं, तो गीता सांगणारा कृष्णही खोटा आणि ज्याचं अयोध्येत भांडवलदारांच्या काळ्या पैशातून भव्यदिव्य 'मंदिर' तुम्ही बांधताय...तो 'राम'ही खोटा, खुशाल समजा!

**...त्या तरुणांची, कसाबशी तुलना करणाऱ्या अमित मालवीयसारख्यांचे मेंदू तपासून घ्याच...तहहयात, आपल्या काळ्या अंतरी 'विद्वेषाची धुनी' चेतवणाऱ्या, समाजाचे लचके तोडणाऱ्या या 'गिधाडां'च्या मेंदुच्या संरचनेतच मोठा बिघाड झालाय.** म्हणूनच, त्या भाजपा 'आयटी–सेल'वाल्या, अमित 'मालवीय'ला 'जागतिक



तापमानवाढी'तून महासागरात बुडू पहाणाऱ्या 'मालदीव'ला पाठवून द्या (नाहीतरी, सध्या मालदीव–सरकारने मोदींनी २०१९ला सही केलेला 'हायड्रॉलॉजी–करार' एकतर्फी रद्द करुन भारतीय परराष्ट्र धोरणाची लक्तरं वेशीवर टांगलीयतच)!

**खरंतरं, या तरुणांच्या मनात–अंतःकरणात कुठलाही गुन्हेगारी अभिनिवेश (Mens Rea) नसल्यानेच, हा कुठलाही गुन्हा नाहीच; फारतर, ते दुःसाहस आहे. त्याची थोडक्यात काय सजा द्यायची ती द्या (खरंतरं, त्याचीही गरज नाही). ज्यांची कॉलर पकडून एक गरीब खेडूत स्त्री देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरुंना विचारती झाली होती, ''सांगा, या देशाला स्वातंत्र्य मिळाल्याने माझा काय फायदा झाला?''... त्यावर, संवेदनशील व तरल बुद्धीचे आपले महान पंतप्रधान व देशातल्या लहानग्यांचे लाडके 'चाचा नेहरु' म्हणाले होते, ''हो, या देशाच्या पंतप्रधानाची कॉलर धरण्याचा 'लोकशाही–हक्क' तुला स्वातंत्र्याने दिलाय''...आभाळाएवढ्या उदार अंतःकरणाचे पं. नेहरु आज, पंतप्रधान म्हणून हयात असते तर?**

आज, पं. नेहरुंच्या अनुपस्थित, असली काही...मनाच्या मोठेपणाची, व्यक्तित्वाच्या महानतेची; आपल्या एखाद्या वादळी स्वप्नात तरी, आपण साधी कल्पना करु शकतो काय? इथे एका गोष्टीची, आवर्जून आठवणं करणं गरजेचं आहे की, ''राहुल गांधींच्या मातोश्री सोनिया गांधींनी, त्यांचे पती व भारताचे भूतपूर्व पंतप्रधान राजीव गांधी, यांच्या मारेकऱ्यांना मोठ्या मनाने माफ केलं होतं!

...तेव्हा, यासंदर्भात, लक्षात घेणं गरजेचं आहे की, हा 'अमृतकाळ' वगैरे नव्हेच; हा 'विषामृत' काळ आहे... देशातल्या तरुणाईसाठी, तळागाळातल्या शेतकरी–कामगार–पोलिस–लष्करी जवानांसाठी हा 'विषा'समान काळ आहे; तर, अदानी–अंबानीसारख्या मोजक्या भांडवलदारांसाठी आणि विद्वेषाच्या राजकारणातून तिजोऱ्या खच्चून भरणाऱ्या भाडखाऊंसाठी 'अमृता'समान आहे!

**ज्या खासदारांनी... त्या निव्वळ, रक्तपिपासू–निर्मम–शोषक 'व्यवस्थे'ला (Vampire-State System) विरोध दर्शवू पहाणाऱ्या, निशःस्त्र तरुणांना बदडून काढलं...ते कुणीही असोत, कुठल्याही पक्षाचे असोत; त्यांच्यावर गुन्हे दाखल व्हायलाच पाहीजेत...अन्यथा, कायदे बनवणारेच, जर अशाप्रकारे कुठलंही संयुक्तिक कारण नसताना, कायदा हातात घेणार असतील...तर, तोच या देशातला 'बेकायदेशीर प्रघात' रुढ होईल. भारतीय संसदेला आपल्या राष्ट्रपित्याने 'वेश्यागृह' का म्हटलं होतं, ते एकूणच आजच्या संसद सभागृहाचं, या तरुणाईच्या निषेधात्मक आंदोलनादरम्यानचं व आदोलनानंतरचं लाजिरवाणं वर्तन पाहून कळतं (बोगस–बनावट 'हिंदुत्व'वाद्यांची, तर साध्या पिवळ्या रंगाच्या फुसक्या बाराने, पिवळी झालेली, या देशाने पाह्यलीय, अजून किती यांच्या अब्रूची लक्तरं निघालेली पहायचं बाकी राह्यलंय?)!**

निवडून आलेली सरकारं निर्लज्जपणे आमदार खरेदी करुन पाडणार, एतचचा निवडणुकीतला गैरवापर तुम्ही जबरदस्तीने चालूच ठेवणार, आंदोलनं बदनाम करुन चिरडून टाकणार, मनमानी पद्धतीने बुलडोझर फिरवणार, न्यायालयंसुद्धा प्रसंगी खिशात टाकणार, संसदेत तर राजरोज अधिवेशन–सत्र धड चालवण्याऐवजी 'निलंबन–सत्र' चालवणार... मग, तरुणाईची माथी काय बर्फासारखी थंडगार रहाण्याची अपेक्षा बाळगताय होय?

**...आम्ही त्या तरुणांच्या दुःसाहसाचं, त्यांच्या कृत्याचं अजिबात समर्थन करत नसलो; तरीही, त्यांच्या कायदाबाह्य कृतितून का होईना, पण त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न... आम जनतेच्या आणि देशातल्या लोकशाहीच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून फार फार महत्त्वाचे आहेत... त्या प्रश्नांची उत्तरं आणि त्यांच्यावरचे राजकीय–इलाज कोण आणि कधि करणार, हे सांगा?** त्यामुळेच, आजच सांगतो की, आम्ही 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन महाराष्ट्राच्या, त्या 'अमोल शिंदे' नामक तरुणाचा जाहीर सत्कार करणार आहोत...UAPAसारखी दहशतवादविरोधी कायद्याची खोटी गंभीर कलमं लावून तरुणपिढीला धडा शिकवू पहाणाऱ्या, भांडवलदारांच्या दलाल गधड्यांनो, जास्त अन्याय–अत्याचार, दिल्ली–पोलिसांकरवी त्या पोरांवर पोलिस–कोठडीत डांबून कराल; तर, हा देश आणि भारत देशातला हा, शिवछत्रपतींचा महाराष्ट्र–देश, गपगुमान सहन करणार नाही...लोकसभा–निवडणूक–२०२४च्या मतपेटीतून (फक्त, निवडणूक एतच वर नको, हिंमत असेल तर बॅलेट–पेपरवर होऊ द्यात, मग बघाच!) धडा, तुम्हाला शिकवला जाईल!

***॥ जय महाराष्ट्र, जय हिंद ॥***

*(संयुक्त–महाराष्ट्रानंतर, आता 'स्वायत्त–महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त–महाराष्ट्र'... 'शिवछत्रपती–राष्ट्र'!)*

**...राजन राजे** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

### *...तरी, तुमच्या भांडवलशाहीला उदारमतवादी म्हणता?...(पान क्र. १ वरुन)*

''वानराचा नर करते, ते विज्ञान...नराचा नारायण करते, ते अध्यात्म आणि 'नारायणाचा नर व नराचा वानर', असा उलटा प्रवास घडवते, ती 'भांडवलशाही'...!!!

तेव्हा, हा 'नरोबा' की, 'वानरोबा' ??? नीट बोल 'नाऱ्या' म्हणावं; तर, नाऱ्या म्हणतो, ''मांडवाला आग लागली''...!!!

**अति पैसा, अतिरेकी नफा कमावल्यानंतर भल्याभल्यांची बुद्धी चाळवते, साफ बिघडून जाते... तशी तुमची बुद्धी–तुमची मती बिघडलीय, (वा) नरायणमूर्ती! नराचा, वानर होणं... यालाच म्हणतात. एखाद्या मानसोपचारतज्ज्ञाकडून तत्काळ तपासणी करुन घ्याच! कार्ल मार्क्सने, हे अचूक जाणलं होतं...म्हणून, त्याने त्याच्या ऐतिहासिक ग्रंथाचं नाव 'दास कॅपिटल' ठेवलं, 'दास कॅपिटॅलिस्ट' नाही ठेवलं! भांडवलाचा गुणधर्मच असा की, 'अत्युच्चपदी थोर बिघडतो'; तशी तुमची त्या अब्जावधी डॉलर्सच्या अन्याय्य–अनितिमान वरकड–कमाईने (Surplus-Value) मती फिरलीय. 'मानवीमूल्यं' पायदळी तुडवत, दुसऱ्यांवर सतत कुरघोडी करत, मानवी–जगण्यातली शांति–समाधान उध्वस्त करुन...तुम्हा लोकांना नेमका कुठला 'राक्षसी–सैतानी विकृत आनंद' मिळतो... ज्यासाठी 'कर लो दुनिया मुठ्ठी में' अशा हव्यासाने, संपूर्ण जगच तुम्ही वेठीला धरताय?**

जगभरात अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे उद्योग–सेवाक्षेत्रातील रोजगार–क्षमता मारली जात असताना (ही, 'Jobless-Growth' केवळ, नव्हे; तर, 'Jobloss-Growth' आहे...म्हणजे, एखाद्या कंपनीची अत्याधुनिक तंत्राने व तंत्रज्ञानाने वार्षिक–उलाढाल वाढत असताना, मुळात असलेले रोजगारच झपाट्याने संपुष्टात येत जाणं) कामाचे दिवस व दिवसाचे कामाचे तास कमी करण्याकडे सार्वत्रिक कल असतानाच... 'जू बैसले मानेवरी आणि चाबूक हा पाठीवरी', घेऊन आठवड्याला म्हणे, ''राष्ट्राच्या प्रगतीसाठी, राष्ट्राच्या उभारणीसाठी ७० तास काम करा''... असा, नाऱ्याने ठरवून पद्धतशीर 'आवाज' टाकताच...मी मी म्हणणारे, भांडवली 'सामंत व समंध' एकदम जागे होऊन... 'इसबेला आयला', सिंगल–माल्ट व्हिस्कीचा पंचतारांकित पेग मारुन...तारस्वरात (वा)नरायणमूर्तींची 'री' ओढू लागले.

...तरीही, रस्त्यावर उतरुन तर सोडाच; पण, समाजमाध्यमातूनही साधा निषेध न करताच, कामगार–कर्मचारीवर्ग नेहमीप्रमाणे झोपलेलाच!

त्यांना बसल्या जागी, काहीही न करता, जागचं बूड न हलवता... केवळ, स्वतःसाठीच सगळं हवंय. 'कंत्राटी–कामगार पद्धती'च्या गुलामीत रोज पिचल्या जाणाऱ्या, आपल्या इतर नवतरुण लाखो कामगार–बांधवांची, त्यांना बिलकूल फिकीर नाही. या दळभद्री मनोवृत्तीतूनच कामगार–चळवळ आज आचके देतेय आणि कामगारविरोधी धोरणं ('भाजपा'सरकारने लादलेली ४ काळ्या कायद्यांची काळीकुट्ट 'कामगार–संहिता' वगैरे) व या (वा)नरोबासारखी कामगारविरोधी वाजणारी थोबाडं, काहीकेल्या थांबायला तयार नाहीत!

**अरे, (वा)नरोबा, तंत्रज्ञानाने माणसांचं जीवन हलकंफुलकं, कमीतकमी कष्टाचं व सुखासमाधानानं भरलेलं आणि सुरक्षित–निश्चिंत, आरामदायी होणार नसेल; तर ते तुमचं तंत्रज्ञान, काय चुलीत घालायचंय, सरपण म्हणून? कुठल्या देशाच्या विकासाविषयी बोलताय आपण? देश, दगडधोंड्यांचा–कॉंक्रिटच्या बांधकामांचा असतो काय? तो असतो, जिवंत हाडामांसाच्या माणसांचा... आशाआकांक्षा ज्यांच्या धमन्यांतून निरंतर धावत असतात, अशा भावभावना–संवेदनांच्या चेतासंस्थांनी परिपूर्ण माणसांनी भरलेला प्रदेश, म्हणजे असतो देश!**

आठवड्याच्या ७० तासांच्या कामाचा, कामगार–कर्मचारीविरोधी 'भांडवली–सट्टा' लावून... तेवढं अचकट–विचकट बोलून आपण थांबला नाहीतच. पैसा आणि यशाची नशा डोक्यात भिनलेल्या टिपीकल 'भांडवलदारा'सारखं (जेफ बेझोस, एलियॉन मस्क... या आपल्याच कुळातल्या विकृत धनदांडग्यांसारखेच) आपलं बरळणं पुढे चालूच राहीलं आणि नुकतीच आपली जीभ थेट घसरली, ती गोरगरीबांना मिळणाऱ्या तथाकथित फुकट्या सवलतींवर... म्हणे, ''कुणालाही राष्ट्रीय योगदान दिल्याखेरीज फुकट काही दिलं जाऊ नये आणि भारतासारख्या गरीब राष्ट्राला समृद्ध बनवण्यासाठी 'उदारमतवादी–भांडवलशाही' हाच एकमेव पर्याय होय!''

...एवढा देशाविषयी कळवळा आहे; तर मग, तब्बल २५ लाखांची बड्या भांडवलदारांची कर्ज, मोदी–शहांच्या भाजपा सरकारकडून माफ करण्यात आली...त्याविषयी, कधि काही बोलला नाहीत ते? आणि, भारतीय–बँकांचे हजारो कोटी बुडवून पळून गेलेल्या उद्योगपतींना काय 'भारतभूषण' पुरस्कार द्यायचा, असं आपलं म्हणणं आहे की, काय... कारण, त्यावरही आजवर आपली अळीमिळी गूपचिळीच?

> ***...औषधाला तरी 'लोकशाही', तुमच्या आयटी–उद्योगात किंवा भारतातल्या इतर उद्योग–सेवाक्षेत्रात शिल्लक आहे का, (वा) नरायणमूर्ती... या प्रश्नाचं आधी उत्तर द्या आणि मगच, 'उचलली जीभ लावली टाळ्याला करत', अशी बेजबाबदार विधानं करा!***

- **३(वा)नरायणमूर्ती, तुम्ही किंवा तुमचं कुटुंब, 'उदारमतवादी' वगैरे अजिबात नाहीच (किडूकमिडूक दानधर्म करुन कोण 'उदारमतवादी' होत नसतो...तुम्हा कुटुंबियांच्या अफाट संपत्तीचा किमान ९०% हिस्सा, राष्ट्राच्या सार्वजनिक शिक्षण–आरोग्य सेवेला अर्पण करा... मगच, या विषयावर आपण बोलू). निदान जगासमोर असा उघडा पडलेला तुमचा भंपकपणा, आतातरी दूर सारा आणि 'इन्फोसिस'ची जरा 'ताटी' उघडून बघाच...**
- इन्फोसिसमध्ये डझनावारी कार्बाईनधारी कमांडोज कशासाठी असतात? उद्योग व सेवा क्षेत्रातील बहुसंख्य कंपन्यांतील मौजूदा 'कंपनी–दहशतवादा'विषयी (Corporate-Terrorism) आपलं काय म्हणणं आहे? ...तो 'कंपनी–दहशतवाद' पोसण्यासाठीच तिथे कार्बाईनधारी कमांडोज किंवा टगे बाऊन्सर्स ठेवलेले नसतात काय? कारण, काय तर म्हणे, 'दहशतवाद्यां'कडून होणाऱ्या संभाव्य हल्ल्यापासून कंपन्यांचं संरक्षण करण्यासाठी कमांडोज नेमलेले असतात...खरंतरं, युनियन्स वगैरे करण्याची हिंमत, कामगार–कर्मचारीवर्गाने करुच नये...म्हणूनच, तिथल्या कर्मचाऱ्यांवर 'व्यवस्थापकीय–जरब' बसवण्यासाठीच ठेवलेले, ते कमांडोज–बाऊन्सर्स नसतात काय? जोडीला कर्मचाऱ्यांवर CCTV ची करडी नजर सदैव रोखलेली!

**तेव्हा, 'दहशतवादा'चा धोका, कंपन्यांच्या बाहेर अस्तित्वात नाही; तर, तो तुमच्यासारख्यांच्या आशिर्वादाने, आयटी–उद्योगाच्या आत चांगलाच हातपाय पसरुन आहे...म्हणूनच, संपूर्ण आयटी–उद्योगात नावाला देखील युनियन्स नाहीत किंवा एवढा अन्याय–अत्याचार–शोषण असूनही, त्याविरोधात संघटित स्वर, कुठेही उमटू शकत नाही!**

**... तरीही, 'भांडवली–व्यवस्था' उदारमतवादी असू शकते, राहू शकते... असा आपला दावा असावा, (वा)नरोबा?**

- सगळ्याच आयटी व इतर कंपन्यांमधील 'प्रोजेक्ट' वगैरेंच्या नावावर चाललेली कामाची जबरदस्ती, जरा डोळे उघडून नीट बघा. आंधळा धृतराष्ट्र नका होऊत (वा)नरायणमूर्ती! दिव्यदृष्टी बाळगलेला महाभारतातला 'संजय' व्हा; तरंच काही कळेल, काही दिसेल... नाहीतर, दिव्याखाली अंधारच वस्तीला रहायचा, याहीपुढे तसाच....
- 'रेड–फ्लॅगिंग', हे मानवी–स्वातंत्र्याची गळचेपी करणारं बेकायदेशीर तंत्र, नॅसकॉमसारखी आयटी–शिखरसंस्था युनियनबाजी करणाऱ्या व व्यवस्थापनाला नडणाऱ्या कर्मचाऱ्यांना...समस्त आयटी–उद्योगातून कायमचं बहिष्कृत करण्यासाठी वापरते किंवा नाही; यावर, (वा)नरोबा भाष्य करा. 'रेड–फ्लॅगिंग', ही काय भानगड आहे... ते कोणाचं अपत्य आहे आणि ते कोणी, कशासाठी वाढवलंय, हे आम्हा पामरांना कळेल काय?
- **आयटी'ची ऐट संप(व)ताना... माहिती–तंत्रज्ञानाचाच गुन्हेगारी दुरुपयोग करुन वेठबिगारासारखं नव्या उच्चशिक्षित आयटी–इंजिनियर्सकडून व्यक्तिगत 'बॉण्ड' जबरदस्तीने लिहून घेणं, हाच का आपला 'भांडवली–उदारमतवाद'? आणि, त्याहीपेक्षा अधिक जबरदस्तीने व घृणास्पदरित्या ते ठोकून वसूल करण्याची यंत्रणा, आजवर कोणी उभारलीय व कोणी चालवलीय आयटी–क्षेत्रात?**

अडल्यानडल्या नवतरुण आयटी–इंजिनियर्सकडून इन्फोसिससह विविध आयटी–व्यवस्थापनं, प्रसंगी पगाराच्या पंधरा–वीस पटीपेक्षाही जास्त रकमेचे 'पर्सनल–बॉण्ड्स' लिहून घेतायत आणि 'रेड–फ्लॅगिं'गच्या अमानुष–घृणास्पद प्रथेच्या धमकावणीतून ते सहजी वसूलही करतायत...त्याच, भांडवलशाहीला 'उदारमतवादी' म्हणता, (वा)नरायणमूर्ती?

...औषधाला तरी 'लोकशाही', तुमच्या आयटी–उद्योगात किंवा भारतातल्या इतर उद्योग–सेवाक्षेत्रात शिल्लक आहे का, (वा)नरायणमूर्ती... या प्रश्नाचं आधी उत्तर द्या आणि मगच, 'उचलली जीभ लावली टाळ्याला करत', अशी बेजबाबदार विधानं करा!

- महाराष्ट्रातल्या तरुणाईला दूर आसाम, राजस्थान, तामिळनाडूत पाठवायचं... तर, तिथल्या तरुणांना महाराष्ट्रात, गुजराथला किंवा अन्य कुठल्यातरी दूरच्या प्रांतात पाठवायचं, जेणेकरुन ते बावचळून तिथे निमूटपणे संघटित न होता, अन्याय–अत्याचार–शोषण सहन करत निमूट रहातील. बरं, तुमच्या आयटी–उद्योगातलं व्यवस्थापन एवढं भावनाशून्य व बेपर्वा की, दूरच्या प्रांतातून अथवा शहरातून येणाऱ्या नव्या नोकरदारांना रहाण्याची–येण्याजाण्याची सोय करण्याबाबत काडीचंही लक्ष घालत नाही...*(पान क्र. ६ वर)*

*..(पान क्र. ५ वरुन)*
(खरंतरं, विनामूल्य वा वाजवी दरात, या सुविधा संबंधित कंपन्यांनीच पुरवायला हव्यात). परक्या शहरात-प्रांतात आलेल्या, त्या बिचाऱ्या तरुण मुलामुलींची बिलकूल पर्वा केली जात नाही (इन्फोसिस, ही देखील त्यातलीच)...ही तुमची, 'उदारमतवादी भांडवलशाही' का?

- तुमच्या आयटी-उद्योगात जेवढे अन्याय-अत्याचार-शोषण आहे, तेवढं बघून बाहेरच्या औद्योगिक-विश्वालाही शरम वाटावी. नियमितपणे १०-१२ तास मान मोडून कामं करवून घेऊन, कामाच्या नोंदी (Records) व्यवस्थित राखण्यासाठी ८ तास काम केल्याच्या कथितरित्या खोट्या नोंदी सर्रास ठेवल्या जातायत... यासंदर्भात, प्रतिकार तर सोडाच; पण, थोडी खळखळ जरी कुणाकडून केली गेली; तरी तुमची ती, 'उद्यापासून कामावर नको' कळवणारी, 'गुलाबी-पावती' (Pink Slip) संबंधित कर्मचाऱ्याच्या हाती ठेवली जाते (माझी भाची काम करत असलेल्या, एका मोठ्या आयटी-कंपनीत तर, अशा धक्कादायक घटनेमुळे रक्तदाब वाढून नुकताच कामाला लागलेला एक तरुण इंजिनिअर बेशुद्ध पडला होता; तरीही, त्याकडे तिथल्या HR/IR वाल्यांनी ढुंकूनही पाहिलं नाही)...
- लग्नातल्या गर्दीत, जेवणाच्या पंक्तिला जेवणाऱ्यांच्या मागे उभे रहातात, त्याप्रमाणे 'बेंच'वर बसवलेले (कधिकधि दोन वर्षांहून अधिककाळ देखील) जादा आयटी-कर्मचारी, तुमची जागा पटकवायला तयारच ठेवलेले बघून, कोण अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध आवाज उठवेल? 'क्युबिकल'मध्ये बसलेले काय किंवा 'बेंच'वर बसलेले काय...दोन्ही एकप्रकारे गुलामच!
- **लैंगिक-शोषणापासून अनेकविध गैरप्रकार, आय-टी उद्योगात सुरु आहेत...पण, तरीही 'कॉर्पोरेटीय-शांति'चा सन्नाटा पसरलेला आहे तिथे. ही कुठल्याही प्रार्थनास्थळीची पवित्र-शांतता नव्हे; ती आहे, स्मशानातल्या मुडद्याफरासांची अपवित्र-निर्जीव शांतता, (वा)नरोबा...पण, तुम्ही कशाला तिकडे लक्ष घालाल? नको तिथे तोंड खुपसायला तुमच्याकडे भरपूर वेळ आहे...पण, 'कंपनी-दहशतवाद'ग्रस्त** (Corporate-Terrorism) **आयटी-उद्योग वा इतर औद्योगिक-विश्वाबद्दल (जिथे, सशस्त्र बाऊन्सर्स ठेवले जातात) कधि, ब्र तरी काढलाय तुम्ही?**
- **ड्रायव्हरला कंपनीने शेअर्स देऊन** (Stock Options) **कोट्यधीश करण्याचा 'इन्फोसिस-जमाना' केव्हाचाच मागे पडलाय, पार जुन्या झाल्या त्या भाकड गोष्टी... आता, त्याऐवजी, आऊटसोर्सिंगचे 'कंत्राटी-गुलाम' वापरताना, शरम नाही वाटत कुणाला इन्फोसिसमध्ये? तुम्ही भांडवलदार लोकं, संपत्ती निर्माण करण्यात खूपच हुशार हो...पण, संपत्तीच्या न्याय्य वाटपाच्या वेळी, आपली कुशाग्र बुद्धी कुठे पेंड खाते?**

...तरी, तुमच्या भांडवलशाहीला 'उदारमतवादी' म्हणता? जेव्हा, सुरुवातीला 'आयटी'ची ऐट होती; तेव्हासुद्धा, तुमच्या तरुण आयटी-इंजिनियर्सना आमचा कायमचा प्रश्न राहीलेला होता, ज्याचं उत्तर त्यांच्याकडे नाही... तो असा की, मान्य, तुमची पिढी खूप नशीबवान, खूप संसाधनसंपन्न, खूप श्रीमंत जरुर आहे...पण, तुम्ही क्षणभर तरी, खराखुरा निश्चिंतपणे 'विश्राम' कधि करु शकता (Can You Relax?) का?'' ...हेच, ते त्यांच्या जगण्यातलं सहजसोपं नैसर्गिक सौख्य, निखळ मैत्र, मानवीमूल्यांची कास धरणं...तुम्ही हिरावून घेतलंयत! म्हणून, ही पिढी आतून ढासळलेली आहे,

**''तंत्रज्ञानालाच ब्रह्मज्ञान'' समजण्याची घोडचूक करुन बसलीय...त्याची कटू फळं, त्यांच्या वाढत्या वैफल्यग्रस्ततेत आहेत. त्यातूनच, ती विविध अंमली-पदार्थांच्या आहारी जाऊ पहातेय ('उडता पंजाब', अजून वेगळं काय दर्शवतो?) ...प्रामुख्याने तुमच्याच आयटी-इंडस्ट्रीमध्ये उठसूठ 'पार्टी-संस्कृती', कॉर्पोरेट-क्षेत्रातर्फे जाणिवपूर्वक रुजवण्यामागे कुठली कारणं आहेत, सांगा? खुट्ट काही झालं की, टोकाची पावलं उचलणारी ही पिढी 'आत्महत्याग्रस्त' होण्याचं प्रमुख कारण, तेच आहे.**

...(वा)नरोबा, ही तुमची पापं आहेत, तुमच्या भांडवली-व्यवस्थेची 'कृष्णविवरं' (Black Holes) आहेत. अगदी रतन टाटांसकट, आता एकही उद्योगपती, 'खरा उदारमतवादी' वगैरे बिलकूल राहिलेला नाही...तुम्ही सगळेच, या रक्तपिपासू-निर्मम-शोषक व्यवस्थेच्या (Vampire-State System) आधारस्तंभांपैकी एक आहात आणि ज्या बड्या राजकारण्यांच्या घरीदारी तुम्ही लोकं जाता, ऊठसूठ भेटता, गळ्यात गळे घालता... ते सगळेच प्रस्थापित राजकारणी आर्थिक स्वार्थापोटी, तुमच्या भांडवली-व्यवस्थेच्या पालखीचे भोई झालेले आहेत, बस्स्! नीरा राडिया प्रकरण काय किंवा प्रत्येक कर्मचाऱ्यावरची (तुमचंच माहिति-तंत्रज्ञान गैरप्रकारे व गुन्हेगारीवृत्तीने वापरुन) तुमची सदैव चाललेली हेरगिरी किंवा तुमच्याकडून ठेवली गेलेली पाळत... तर, KGB, CI-चं काय; पण, 'पेगॅसस'सारख्या अत्याधुनिक 'स्पाय-सॉफ्टवेअर'चा वापर करुन चालणाऱ्या इस्रायलच्या 'मोसाद'ला देखील लाजवणारी असताना...(वा)नरोबा, भांडवलशाहीला 'उदारमतवादी' म्हणता? तुमच्यासारखीच, बनेल आणि गुळमुळीत भाषा, रतन टाटांनीही मागे शहाजोगपणे वापरलेली होती...ते म्हणाले होते, "The Capitalism has failed to deliver, kind of "societal-benefits', it is capable of delivering"... पण, त्यांच्याच टाटा-समूहातील कंपन्यांमध्ये आणि आयटी-उद्योगातल्या 'टीसीएस'मधील परिस्थिति काय सांगते?

...अहो (वा)नरायणमूर्ती, भांडवलशाहीच्या उद्गात्या डम स्मिथनेच ज्या व्यवस्थेला, मुळातूनच 'माणूस म्हणजे वासनांचं गाठोडं' म्हणत जन्माला घातलं आणि पुढे भांडवलशाहीचा, वखवखलेल्या वासनांच्या मागे धावणारा, भांडवली-गोतावळा जगभर तयार झाला...त्या वासना-विकारांची पिल्लं, आज जगभर वळवळत, अवघ्या माणुसकीलाच विषारी डंख मारुन संपवतायत, तरीही भांडवलशाहीला 'उदारमतवादी' म्हणण्याचं धार्ष्ट्य दाखवता, (वा)नरोबा?

'वासनांच्या गाठोड्या'वरच जिची उभारणी...ती भांडवलशाही, स्वयंभूरित्या उदारमतवादी कधि असू शकेल? कुठल्या अस्तित्वात नसलेल्या तार्किक-शक्यतेबद्दल बोलतोय आपण?? भांडवलशाही, ना कधि उदारमतवादी होती, ना कधि असेल! भांडवली-व्यवस्थेचं सगळ्यात मोठं पातक, हे निव्वळ 'शोषण' करणं नसून (ते तर आहेच, पण ते नंतरचं आहे), सगळी 'मानवीमूल्यं'च समूळ नष्ट करणं, हेच ते महापातक होय!

'भांडवलशाही-व्यवस्था' (Capitalism), ही दारु आणि अंमली (ड्रग्ज्) पदार्थांसारखी विलक्षण 'झिंग' पैदा करणारी चीज होय! एकवेळ, दारु-सिगरेट-अंमली पदार्थांचं व्यसन सुटेल; पण, 'भांडवली-व्यवस्थे'तल्या चैनबाजी, ऐशोआराम, सुखसंसाधनांचं जडलेलं व्यसन सुटणं मोठं कर्मकठीण. व्यक्तिगत व्यसन, हा एखाद्या व्यक्तीला किंवा फारतर, त्या संबंधित व्यक्तिच्या कुटुंबाला बरबाद करेल...पण, हे 'भांडवली-व्यवस्थे'चं व्यसन, एवढं खतरनाक व व्यापक आहे की, संपूर्ण पृथ्वीतलावरच्या सजीवसृष्टीचाच सर्वनाश घडवून आणण्याची राक्षसी अंगभूत क्षमता, त्यात मौजूद आहे.



'बळी, तो कानपिळी', या जंगली, असुरक्षित व अमानुष अवस्थेतून बाहेर येण्यासाठीच, द्विपाद मनुष्यप्राण्यांनी जंगलं तोडून गावं-शहरं-उपनगरं वसवली...आणि, भांडवली-व्यवस्थेतून पुन्हा, तिचं विषवल्ली रुजवताय?

तेव्हा, ''नारायणाचा नर आणि नराचा वानर'' करणाऱ्या, तुमच्या तथाकथित 'उदारमतवादी-भांडवलशाही'चं 'सत्यस्वरुप' जरा, थोडक्यात जाणूनच घेऊयाच....

- **उद्योग-सेवा क्षेत्रातील 'सर्वात कमी वेतनमान आणि सर्वोच्च वेतनमान' यात १ : १२ पर्यंत जास्तीतजास्त प्रमाण किंवा गुणोत्तर राखायला जी 'नकार' देते आणि हे प्रमाण/गुणोत्तर यथावकाश संधि शोधून वा जबरदस्तीने अथवा अनुकूल परिस्थिति निर्माण करुन (उदा. कंत्राटी-कामगार पद्धत, आऊटसोर्सिंग वगैरे टोकाचं शोषण करणाऱ्या पद्धती लादून, धड पाच आकडी नसलेल्या 'किमान-वेतना'वर बहुसंख्याक कामगार-कर्मचारीवर्गाला राबवून घेऊन आणि दुसऱ्या बाजुला मोजक्या व्यवस्थापकीय मंडळींना मनमानी पद्धतीने, शेकडो कोटींच्या डोळे फाडणार्या वार्षिक-पॅकेजच्या आकड्यांमध्ये पगार/भत्ते/ सोयीसवलती/'**Severance Package' **वगैरे देऊ करुन) फुगवत फुगवत, एकास शेकडा नव्हे; तर हजारोंच्या घरात नेऊन अमानुष आर्थिक-विषमता निर्माण करत जाते, तिला म्हणतात 'भांडवलशाही'!**

तळागाळातला कामगार-कर्मचारीवर्ग...*(पान क्र. ७ वर)*

..(*पान क्र. ६ वरुन*)
तुटपुंज्या पगारावर राब राब राबत असताना, बड्या व्यवस्थापकीय मंडळींचे अवास्तव व बेछूट मोठे पगारभत्ते, हाच कॉर्पोरेटीय क्षेत्रातला सगळ्यात मोठा 'कायदेशीर भ्रष्टाचार'...पण, त्याबद्दल आपण कधि तोंड उघडलंत?

- **''कामगार/कर्मचारी म्हणजे, जणू प्रक्रिया करायचा 'कच्चा–माल'च...कसाही वापरा आणि वापरुन झाला की, फेकून द्या'', अशी निर्घृण 'मनोविकृती', ज्या व्यवस्थेत बळावते, असंच नव्हे; तर, ज्या व्यवस्थेचा तो अंगभूत गुणधर्मच असतो...तिलाच 'भांडवलशाही' म्हणतात!**
- या आधुनिक भांडवली–व्यवस्थेत समाजातला सगळाच बुद्धिमान, उच्चपदस्थ व व्यावसायिक–यशस्विता पदरी बांधणारा 'अभिजनवर्ग'...एकमेकाशी संधान बांधून (Coalition Of Connected) समाजपुरुषाचं 'शोषण' करत मजेत–चैनीत जगत असतो आणि असं 'चंगळवादी जीणं' जगताना मूठभर भांडवलदारांची सत्तापिपासू वृत्ती, अहंकार, ऐय्याशी पोसण्यासाठी... अवघ्या मानवतेला व सजीवसृष्टीला वेठीला धरु पहाते, ती असते भांडवलशाही...

**'कार्बनकेंद्री' भांडवली 'अर्थव्यवस्था व जीवनशैली'तून नवनव्या प्रदूषणकारी कृत्रिम, घातकी गरजा बेलगाम–बेसुमार वाढवत नेण्यातूनच 'जागतिक तापमानवाढी'सारखी पर्यावरणीय महासंकट, पृथ्वीवर धुमाकूळ घालत असताना...COP–२८ दुबई परिषदेत जीवाश्म–इंधनांचा (तेल, वायू, कोळसा) वापर थांबवणं...बेजबाबदारपणे अशक्यप्राय असल्याचं म्हणते आणि मानवजातीसह अवघ्या सजीवसृष्टीला सर्वनाशाप्रत नेऊ पहाते, तिचं नाव 'भांडवलशाही'.**

...कारण, रासायनिक, आण्विक व विद्युत–चुंबकीय घातकी प्रदूषणाविना 'भांडवलशाही–अर्थव्यवस्था' तत्काळ कोसळून पडेल...संदर्भ : तुमचा जावईबापू आज, ज्या इंग्लंडचा पंतप्रधान आहे (ज्यांच्याविषयी, ब्रिटनमधील टोकाच्या 'आर्थिक–विषमते'वर प्रहार करणारा गॅरी स्टीव्हन्सन, नावाचा चळवळ्या म्हणतो, "Most people don't seem to be aware of just how insanely rich their PM is") त्या णघ सरकारला ३० ऑक्टोबर–२००६ साली सादर करण्यात आलेला, निकोलस स्टर्न लिखित ७०० पानी 'स्टर्न रिव्ह्यू'चा दस्तावेज

- **समुद्राचा तळ ओरबाडून मच्छिमारी करणं, समुद्राचा तळ खोदून बेसुमार तेल–वायू उत्खनन करणं, अवघा आसमंत प्रदूषित करुन हरित–वायू उत्सर्जनाची त्यात घातकी भर घालणे व ओझोन थराला जागोजागी छिद्रं पाडणे, पृथ्वीमातेवरील अन्न–पाणी प्रदूषित करुन निसर्गचक्रिय–व्यवस्था (उदा. कार्बन व नायट्रोजन चक्र) व सजीवांच्या विविध अन्न–साखळ्या उध्वस्त करत 'जैववैविध्य' नष्ट करणं...आणि, त्यातूनच सजीवसृष्टीसह मानवजातीच्याही अंताला कारणीभूत ठरणं... तुझं नाव, भांडवलशाही!**
- साम्यवादाचं–समाजवादाचं आव्हान होतं, तोपर्यंतच लोकशाही–स्वातंत्र्याचा व व्यक्ति–स्वातंत्र्याचा खोटा मुखवटा धारण करुन अमेरिकन–युरोपियन भांडवलशाही, जगभरातील 'कम्युनिझम'ला दडपशाहीच्या मुद्द्यावर कडवा विरोध करत, छाती पुढे करुन मिरवत होती... शीतयुद्ध समाप्तीनंतरच्या काळात, विशेषतः, खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या 'खाउजा' धोरणापश्चात, साम्यवाद (Communism) आणि समाजवादाचं (Socialism) आव्हान मोडीत निघाल्यानंतर, भांडवलशाहीचा अतिशय भेसूर, क्रूर, विकृत; पण, खराखुरा चेहरा, जगभरात जागोजागी वेडावाकड्या पद्धतीने दिसायला लागला... अशा 'गोंडस' मुखवट्याआड जी लपलेली असते, ती नितीमत्ताशून्य–माणुसकीशून्य अशी, खरीखुरी भांडवलशाही!
- 'शासकीय–भांडवलशाही' (State-Capitalism), ही अंतरिम–व्यवस्था, साम्यवादी–व्यवस्थेच्या अंतिम–मांडणीसाठी आणता आणता...त्या 'स्टेट–कॅपिटॅलिझम'लाच कवटाळून बसत रशिया–चीन वगैरे देशांनी केलेल्या ऐतिहासिक घोडचुकांचं आयतं 'भांडवल' बनवणाऱ्या भांडवलशाहीने तर, माणुसकीचं संपूर्ण भांडवलंच क्रूरपणे नष्ट करुन अमानुषतेचा कळस गाठलाय... उदा. 'पंचतारांकित हॉटेलातील भिकारीण' अशी ज्या अमेरिकन भांडवली–व्यवस्थेची लक्तरं काढली जातात... ती, अमेरिकन–अर्थव्यवस्था, जगातली सगळीच युद्धं थांबली; तर, पळभर तरी चालू शकेल काय, (वा)नरोबा?
- भांडवलशाहीला नसते कुठली नीतिमत्ता... असलीच, तर आत्यंतिक स्वार्थप्रेरित, आपल्या सोयीप्रमाणे भूमिका बदलणारी नीतिमत्ता ('Flexibel' Ethos) असते, भांडवलशाहीला नसतो कुठला धर्म, नसतो कुठला 'देश'...डोळ्यासमोर सदैव असतो, फक्त रग्गड नफ्याचा (Surplus-Value) 'धनादेश'!

लहान मुलांच्या दुधाच्या पावडरपासून ते अंगातोंडावर लावायच्या पावडरपर्यंत (आठवा, जॉन्सन बेबीपावडर) आणि खाण्याच्या न्यूडल्सपासून ते थेट शीतपेयांपर्यंत... नफे उकळण्यासाठी, जी बिनदिक्कत 'कर्करोग'कारक (Carcinogens) घटक वापरु शकते, ती असते 'भांडवलशाही'!!

**संधि शोधत वा निर्माण करत वजनमापात फसवणूक, भेसळयुक्त वस्तुमाल, कृत्रिम टंचाई, काळाबाजार, साठेबाजी, बेसुमार भाववाढ आणि शिवाय भरीला, 'अर्थस्य पुरुषो दासः', या कपटनीतिने 'राजकीय–व्यवस्थेला व प्रसारमाध्यमां'ना पैशाच्या बळावर मांडलिक बनवून जनतेवर लादलेली हुकूमशाही... म्हणजेच, 'भांडवलशाही'!**

**...(वा)नरोबा, कसल्या 'भांडवलदारी–उदारमतवादा'च्या भाकड गप्पा मारतो आहोत... आणि, तडफडणाऱ्या, आक्रंदन करणाऱ्या जगाकडे 'मला काय त्याचं' वृत्तीने पहाणाऱ्या, स्वांतसुखाय जीवन जगणाऱ्या मध्यमवर्गीयांना (भांडवली–व्यवस्थेचे अंशतः 'लाभार्थी' बनवून) उल्लू बनवतो आहोत आपण?**

भांडवलशाहीला पक्कं ठाऊक असतं की, एकदा का 'समाजाला नेतृत्त्व देणाऱ्या' बुद्धिजिवी मध्यमवर्गाला आपल्या 'मगरमिठी'त घेतलं की, मग तळागाळातल्या जनसामान्यांची अनिर्बंधरित्या कायमच ससेहोलपट–होरपळ सहजी करता येते...सध्या आपल्या देशात, तेच भयंकर आक्रित घडतंय; म्हणूनच, शोषित–पीडितांच्या आक्रोश–आक्रंदनाचा उद्रेक होणं दूरच, धड त्याचा उच्चार देखील होत नाही!

**'उदारमतवादी–भांडवलशाही', हे निव्वळ थोतांड, स्वप्नरंजन किंवा दिवास्वप्नच आहे; तर, आजच्या सत्य–स्वरुपातील ढोंगी–बेढंगी 'भांडवलशाही', हे अवघ्या मानवजातीला पडलेलं एक भयंकर 'दुःस्वप्न'च!**

**जगभरातील भांडवलशाहीचा इतिहास सांगतो की, ''जनमताच्या अथवा शासकीय रेट्यामुळे दबावाखाली आलेली 'भांडवली–व्यवस्था', सरड्यासारखे रंग बदलत, तात्पुरती वरकरणी 'उदारमतवादी' वगैरे बनते... पण, दबाव कमी होताच, संधि साधून कटकारस्थानं रचून पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' उक्तिनुसार आपलं काळाकुट्टं रंगरुप दाखवायला दणक्यात सुरुवात करतेच...त्यासाठी प्रसंगी, केवळ सार्वजनिक–भ्रष्टाचाराला ऊत आणूनच नव्हे; तर, भांडवली–प्रगतीआड येणाऱ्यांचे मुडदे पाडून देखील 'भांडवली–व्यवस्था' आपलं 'इप्सित' साध्य करायला, जराही मागेपुढे पहात नाही!''**

१९३०च्या महामंदीनंतरची अमेरिकन–अर्थव्यवस्था सावरताना (New Deal), तत्कालिन अमेरिकन–अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी अमेरिकन भांडवलदारवर्गावर १९४४ साली, सुरुवातीला वार्षिक १० लाख डॉलर्सपेक्षा अधिक उत्पन्नावर १००% (म्हणजेच, एकप्रकारे 'श्रीमंतीची रेषा'च आखली) व नंतर तो थोडा खाली आणून ९४% केला, जो पुढे १९६३ सालापर्यंत चालू होता (सध्याचा, सर्वात जास्त अमेरिकन आयकर–दर ४३.४% आहे).... पण, त्यानंतर, पुन्हा अमेरिकन भांडवलदारवर्गाने जोरदार उचल खाल्ली व पुन्हा अमेरिकेत भांडवली हडेलहप्पी चालू झाली आणि अमानुष आर्थिक–विषमतेचे वारे वहायला लागले, ते आजतागायत!

**...अतिरेकी पैसा कमावण्याच्या राक्षसी हव्यासापोटी केल्या पातकी कृत्यांचा, आयुष्याच्या अंताला पश्चाताप होऊन, कमावलेल्या सगळ्या संपत्तीचा दानधर्म करण्यासाठी, ज्या जॉन रॉकफेलरने 'रॉकफेलर–फाऊंडेशन'ची निर्मिती केली...त्याने देखील, लोकांच्या टाळूवरचं लोणी खाणारे, असले उद्गार कधि काढल्याचं ऐकिवात नाही. तुम्ही तर, सगळीच हद्द पार करुन बसलायत, आम्हाला तुमची लाज वाटते, (वा)नरायणमूर्ती!**

भांडवलशाहीतल्या अतिरेकी विकासाच्या नादी लागून, आधी ''माणूसपण संपतं, मागाहून माणूसच संपतो''!

''साधी रहाणी–उच्च विचारसरणी'', भूतदया, मानवतावाद...या आमच्या भारतीय–अध्यात्माने व आमच्या महात्म्याने–राष्ट्रपित्याने दिलेल्या पृथ्वीमोलाच्या जीवनमूल्यांचाच आग्रह यापुढे धरायला हवा...

श्रीमंत एवढे श्रीमंत झालेत की, कुणालाही खरेदी करु शकतात आणि गरीब एवढे गरीब झालेत की, कुणालाही विकले जाऊ शकतात.

**...संपत्तीचा अधिकार, मूलभूत–अधिकार नव्हेच; कुणाचं तरी खूप काही लुटल्याखेरीज–ओरबाडल्याखेरीज, अवघ्या समाजाचं खूप काही देणं नाकारल्याखेरीज आणि निसर्ग–पर्यावरणावर मोठे अत्याचार केल्याखेरीज...कुणीही 'अतिश्रीमंत' होऊच शकत नाही. तेव्हा, श्रीमंतीची–अतिश्रीमंतीची रेषा आता आखली गेलीच पाहीजे, यासंदर्भात तुमचं काय म्हणणं आहे, (वा)नरोबा...???**

**जाता जाता, एक प्रश्न विचारावासा वाटतो, ''आपल्या कानशीलावर ईडी/सीबीआय/आयटी वगैरे कुठल्या सरकारी दमन–यंत्रणेची बंदूक तर, ठेवली गेलेली नाही ना...की, ज्यामुळे एका...***(पान क्र. ८ वर)*

# “धनदांडगी भांडवली व्यवस्था ही, मलेरियाच्या जंतूंसारखी!”

## पनवेल तालुक्यातील नैना प्रकल्पाविरोधातील स्थानिकांच्या आंदोलनात, राजन राजे यांचा प्रस्थापितांवर जोरदार घणाघात...



पनवेल : शिवछत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात, शेतकऱ्यांच्या जमिनी लाटून, त्यावर धनदांडग्या भांडवलदारांसाठी ‘नैना’ प्रकल्प उभारण्याच्या ‘राजकीय’ कट-कारस्थानाविरोधात, पनवेल तालुक्यातील ९३ गावांतील स्थानिक भूमिपुत्र एकवटले असून, दि. ६ डिसेंबर-२०२३ रोजीपासून, तुरमाळे या गावात शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. याच पार्श्वभूमीवर ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, दि. १२ डिसेंबर-२०२३ रोजी, उपोषणाच्या सातव्या दिवशी, आंदोलनस्थळी उपस्थित राहून, उपोषणकर्त्यांची भेट घेतली. दरम्यान, यावेळी आंदोलनकर्त्यांना संबोधित करताना, मा. राजन राजे यांनी, प्रस्थापित राजकीय व्यवस्था आणि धनदांडग्या भांडवलदारी व्यवस्थेवर एकच शरसंधान साधले. “आमच्या पुढाऱ्यांनी चांगल्या शाळा, दर्जेदार शिक्षण देणारी महाविद्यालयं, वैद्यकीय आणि तंत्रमहाविद्यालयं कधी उभी केली नाहीत. आम्हाला चांगलं शिक्षण मिळालं असतं तर, आमच्या पनवेल तालुक्यातील तरुणांवर आज रिक्षा चालवायची वेळ आली नसती. मात्र, तरीदेखील त्यांचा धोका टळलेला नाही. ज्यादिवशी ते लढणं सोडतील, ज्यादिवशी त्यांच्या संघटनेचं बळ कमी होईल, त्या दिवसापासून ही प्रस्थापित व्यवस्था त्याचा नेमका फायदा घेईल. ज्याप्रमाणे जंतू आपल्या यकृतात दडलेले असतात आणि प्रतिकारशक्ती कमी झाल्यावर जसे उफाळून येतात, अगदी तशीच धनदांडगी भांडवली व्यवस्था ही, मलेरियाच्या जंतूंसारखी आहे. दुर्दैवाने आमचे पुढारीच नालायक आहेत, त्यांची आणि लोकांची नाळ कधी जुळलीच नाही. ते व्यवस्थेचे दलाल आहेत, त्यांच्या पालखीचे भोई आहेत, त्यांच्याकडून तुम्ही वेगळ्या अपेक्षा काय करणार?” अशा प्रखर शब्दांत एकच घणाघात केला.

दरम्यान, दि. ६ डिसेंबर-२०२३ रोजीपासून सुरु झालेल्या या बेमुदत उपोषणात अनिल ढवळे, जयराम कडू, मधुकर पाटील, समीर पारधी, रवींद्र गायकर आणि दमयंती भगत यांनी सहभाग घेतला असून, मा. राजन राजे यांनी त्यांची भेट घेत त्यांचे मनोधैर्य वाढवले. स्थानिक भूमिपुत्र शेतकऱ्यांचे आंदोलन ही, अस्तित्वाची लढाई असून, प्रस्थापितांना इथला शेतकरी नष्ट करुन, स्मार्टसिटी बनवायची आहे, परंतु, ‘धर्मराज्य पक्ष’ कायमस्वरुपी तुमच्या पाठीशी राहून, त्यांचा डाव उधळून लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा ठाम विश्वास मा. राजन राजे यांनी दिला. यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारुन, त्यांना लढण्याची ऊर्जा मिळाली. विशेष करुन, महिलावर्ग त्यांच्या विचारांनी भारावून गेला. यावेळी उपस्थित भूमिपुत्रांना संबोधित करताना ते पुढे म्हणाले की, “रामाची अयोध्या श्रीमंत नव्हती, पण ती परमपूज्य होती. तिथे सुख-समाधान होतं, तिथे न्याय्य होता. म्हणून आपला लढा हा, न्यायासाठी आणि सुख-समाधानासाठी व पुढील पिढ्यांच्या रक्षणासाठी आहे, हे लक्षात ठेवा. ज्याक्षणी आमची जमीन गेली, मग तिची अब्जावधी रुपयांची किंमत का मिळेना, जमीन हातातून गेली की, तुमचं अस्तित्व संपलेच समजा. पैसा येतो... पैसा जातो, पण जमीन कायमची असते. माणूस झाडपाला खाऊनही जगू शकतो, तो उपाशी राहत नाही. जमिनी विकून शहरात आलेल्यांची आज अवस्था बघा, दहा-पंधरा हजार रुपयेही पगार नाही. तुम्हाला अत्यंत विदारक सत्य सांगतो, शेतकऱ्यांच्या आत्महत्या लाखोंनी महाराष्ट्रात झाल्यात, पण सगळ्यात जास्त आत्महत्या ज्या होतात, त्या कामगारांच्या शहरी भागांत होतात. कंत्राटी-कामगारपद्धत, तुटपुंजे पगार यामुळे हे घडतंय. यांनी जाणूनबुजून शहरं महागडी करुन ठेवलीयेत... आपलं शहर आणि गाव सोडून पळून जायची वेळ येऊ द्यायची नसेल तर, कोणीही कितीही बोली लावली तरी, आपली काळी आई विकू नका!” असे भावनिक आवाहनदेखील मा. राजन राजे यांनी केले.



यादरम्यान, ‘धर्मराज्य पक्षा’चे गणेश नाईक, भाऊ म्हात्रे, स्वामी म्हात्रे, संतोष गोवारी, पांडुरंग नाईक, महेंद्र म्हात्रे, वृषभ गोंधळी, विजय म्हात्रे, समृद्धी म्हात्रे आणि प्राजक्ता गोवारी या पनवेल तालुक्यातील कार्यकर्त्यांसह, ‘धर्मराज्य पक्षा’च्या माहितीचा अधिकार कक्षाचे ठाणे शहर अध्यक्ष श्री. अनिल महाडिक, कामगार प्रतिनिधी श्री. समीर चव्हाण, श्री. युवराज पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

---

..*(पान क्र. ७ वरुन)*

**पाठोपाठ एक, असे विखारी फुत्कार आपण टाकताय?”**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

*(हा प्रदीर्घ संदेश तिरीमिरीत मी लिहीला खरा; पण, तो वाचला किती जाईल, याबाबत थोडी साशंकता होती... घडलं मात्र उलटं! याचसंदर्भात, TISSMo प्राध्यापक व विख्यात डावे विचारवंत मा. संजीव चांदोरकरांशी झालेली बातचीत....)*

संजीवजी,

मला वाटलं होतं, आमचा कामगार-कर्मचारीवर्ग कसला हा एवढा प्रदीर्घ लेख वाचतायत म्हणून...प्रत्यक्षात, जाणकारांनी दाद दिलीच; पण, अनेक कामगारांनी एकदोन दिवस मेहनत घेऊन, सदरहू लेख पूर्ण वाचून काढलाच आणि उत्साहवर्धक प्रतिसादही दिला, हे विशेष...धन्यवाद!

---

माझा अनुभव असा आहे राजनजी की, आपण लिहिणाऱ्यांना वाटते त्यापेक्षा काही पटींनी लोक वाचतात. त्याचा सबंध डेमोग्राफिक शिफ्टशी आहे, असे मला वाटते. आपल्या पिढीतील कमी वाचतात. १५ ते ४० मधील वाचतात. मध्यम वर्गातील कमी वाचतात. Bottom of pyramid मधील जास्त वाचतात. आपल्याकडे एक्स्प्रेस करायचे कल्चर नसल्यामुळे, या समाज घटकात धर्म जातींनी भीड घातलेली असल्यामुळे वाचून एक्स्प्रेस होत नाहीत. जर एक वाचक एक्स्प्रेस झाला तर समजा, त्या प्रत्येकामागे किमान २५ ते ५० जणांनी तुमचे लेखन वाचलेले आहे.

***...संजीव चांदोरकर***



# काश्मीरही बनणार कॉर्पोरेट सुवर्णलंका!

**भले हे 'दिल्लीश्वर', ऐश्वर्यसंपन्न-भपकेबाज 'राममंदिर' अयोध्येत उभारतील; पण, इथे कोणी 'रामराज्य' वगैरे निर्मिण्यासाठी सत्तेवर बिलकूल आलेलं नसून, बड्या कॉर्पोरेटीय-भांडवलदारांचे दलाल असलेली; ही भाजपाई 'गुजराथी-लॉबी'... धनदांडग्या-मुजोर मूठभरांसाठी ऐश्वर्यसंपन्न 'सुवर्णलंका' काश्मीरमध्ये, या निर्णयापश्चात, निश्चितच उभारेल...जिथे, 'काश्मिरियत' संपलेली असेल व स्थानिक लोकं, 'कंत्राटी-गुलाम' बनलेले असतील.**

सर्वोच्च-निकालानंतर आता काश्मीरचा, इथून पुढे फक्त पहात रहा, नवा प्रवास.... ''नैसर्गिक-सौंदर्याने विनटलेलं व काश्मिरियतचा सांस्कृतिक-वारसा लाभलेलं पृथ्वीवरचं नंदनवन'' ते ''बड्या भांडवलदारांची, बड्या भांडवलदारांकडून, बड्या भांडवलदारांसाठी उभारली गेलेली कृत्रिम-अनैसर्गिक सुवर्णलंका''!

**ही 'सुवर्णलंका' असेल; स्थानिक जनसामान्यांवरील अन्याय-शोषण-अत्याचारांनी भरलेली...रावणासारख्या अविवेकी, नीतिशून्य, सैतानी 'विकासा'ची कास धरत, ''मुँह में राम और बगल में रावण'', या कावेबाज राजनितीचा हात धरुन उभारलेली!**

भले हे 'दिल्लीश्वर', ऐश्वर्यसंपन्न-भपकेबाज 'राममंदिर' अयोध्येत उभारतील; पण, इथे कोणी 'रामराज्य' वगैरे निर्मिण्यासाठी सत्तेवर बिलकूल आलेलं नसून, बड्या कॉर्पोरेटीय-भांडवलदारांचे दलाल असलेली; ही भाजपाई 'गुजराथी-लॉबी'... धनदांडग्या-मुजोर मूठभरांसाठी ऐश्वर्यसंपन्न 'सुवर्णलंका' काश्मीरमध्ये, या निर्णयापश्चात, निश्चितच उभारेल...जिथे, 'काश्मिरियत' संपलेली असेल व स्थानिक लोकं, 'कंत्राटी-गुलाम' बनलेले असतील.

...त्यांनी महाराष्ट्रातल्या मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, रायगड शहरं-उपनगरांचा कधिकाळी, असाच काँक्रिटचा 'विकास' केला...तिथल्या तळागाळातल्या मूळ श्रमिक मराठी-माणसांना यथावकाश, एकतर १० X १० च्या नगरांमध्ये कोंबडी-कुत्र्यासारखं कोंडलं; नाहीतर, शहराबाहेर पार दूरवर देशोधडीला लावलं. त्यांना देशोधडीला लावण्याकामी, 'स्थानिक-मनगटशहा' असलेल्या मराठी-नेत्यांची पुरेपूर 'ओटी' भरुन...त्यांना यथेच्छ वापरुन घेतलं आणि सोबतीला, सुशिक्षित-उच्चशिक्षित मध्यमवर्गीयांना आपल्या भांडवली-व्यवस्थेचे 'लाभार्थी' बनवत, त्यांचीही 'जीभ' कापून टाकून...या अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध त्यांच्याकडून 'आवाज' उठवला जाण्याची संभाव्य शक्यताच संपुष्टात आणली.

...त्याचीच कार्बन किंवा झेरॉक्स प्रत कालांतराने, काश्मीरमध्ये थोड्याफार फरकाने, आपल्याला उभी रहाताना दिसेल! महाराष्ट्राचं 'मराठीपण', जसं एकाबाजुला धनदांडग्या, मस्तवाल गुजराथी-भाषिकांनी आणि दुसऱ्या बाजुला 'अस्तित्ववादी' उत्तर भारतीयांच्या न थांबणाऱ्या लोंढ्यांनी... अशा शहरं-उपनगरांतून जवळपास संपुष्टात आणलं... तो आणि तसाच प्रकार, 'काश्मीर'संदर्भात होईल! नव्हे, ते तसं होण्यासाठीच ३७० कलम हटवण्याचा घाट घातला गेल्याचं, आपल्या उशीरा ध्यानात येईल... तोपर्यंत, काळाच्या घड्याळाची टिकटिक पुढे अशीच चालू राहील. कधि, काश्मीरचं कलम ३७०, तर कधि बालाकोटचा सर्जिकल-स्ट्राईक; तर, कधि अयोध्येचं राममंदिर...या पोकळ भावनिक हिंदोळ्यांवर झुलत, असंच सर्वसामान्यांचं आयुष्य, 'गुलामगिरी व जगण्याच्या कोंडी'त वाया जात राहील... हेच ते 'रामराज्या'च्या बुरख्याआडचं, भाजपाई गुजराथी-लॉबीचं 'रावणराज्य' होय...!!!

***.... राजन राजे (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)***

ता. क. : राममंदिराच्या निकालानंतर, काश्मीरच्या ३७० कलमाचा देखील सर्वोच्च-निकाल लागला; पण, महाराष्ट्राच्या सीमावादाचा (कारवार-निपाणीसह बेळगाव महाराष्ट्रात सामील करण्याबाबतचा), ज्याचं घोंगडं वर्ष-२००६ पासून गेली १७ वर्षे सर्वोच्च न्यायालयात भिजत पडलेलं आहे, त्याचा निवाडा सर्वोच्च न्यायालयाकडून कधि होणार...???

सदरहू लेखावर व्हॉटस्‌अ‍ॅपवर प्राप्त झालेल्या काही मार्मिक प्रतिक्रिया खालीलप्रमाणे...

या नीच भामट्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन, १०० चौरस किलोमीटरचे प्लॉट बनवून, काळे धनवाल्या धनदांडग्यांच्या परदेशात रजिस्टर झालेल्या कंपन्यांच्या नावे देश खरेदी करण्यासाठी कायदा आणला आहे... LARR BILL 2014/RFCTL-RR BILL २०१५ जेव्हा देश खरेदी करणार, तेव्हा काश्मीर शिल्लक रहात होते! म्हणून कलम ३७० हटवले आहे, हे अजून एकाही अभ्यासकाच्या लक्षात आले नाही!

**(समर्थ भारत आंदोलनाचे सर्वश्री दिलीप गायकवाड यांची, सदरहू लेखावर मार्मिक प्रतिक्रिया...)**

काश्मीरचं ३७० कलम रद्द करण्याचा निर्णयाचं अकारण भावनिक अंगानं राजकारण केलं जातंय.

गेल्या ७० वर्षांत या कलमात, ४० वेळा सुधारणा केली गेली होती. GST ची अंमलबजावणीदेखील आठवडाभर उशीराने का होईना काश्मीरात लागू करण्यात आली होती,सहे वास्तव आहे. दुसऱ्या भाषेत सांगायचं तर, ३७० कलमाला फार काही अर्थच उरला नव्हता. हे वास्तव सर्व प्रथम लक्षात घेतले पाहिजे.

असो. *...(पान क्र. १० वर)*

# 'ग्लोबल कॅपिटॅलिझम' सर्कस

बातमी आहे, अमेरिकेत Environmental, Social, Governance (ESG) Investments funds मधून गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर आपल्या गुंतवणुकी काढून घेत आहेत; काही आश्चर्य वाटायला नको…

कारण, 'ग्लोबल कॅपिटॅलिझम' सर्कशीतल्या विदुषकासारखा आपल्या पोतडीतून नियमितपणे नवीन नवीन संकल्पना/टर्म्स/ काढत असते ; सगळे जग इम्प्रेस्ड होते आणि नंतर ते लोक हळूच अदृश्य होतात; मग नवीन काहीतरी. मग सगळे जण त्या नवीनची चर्चा करतात.

ऐंशीच्या दशकात धडाक्यात नवउदारमतवादी आर्थिक धोरणांची अंमलबजावणी जगभर सुरु झाली. त्याच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या २००० सालानंतर, विशेषतः गरीब आणि विकसनशील देशांमधून या आर्थिक तत्त्वज्ञानाने तयार केलेल्या अरिष्टांची, आणि म्हणून तयार होणाऱ्या असंतोषाची, विभागणी दोन प्रकारात करता येते: सामाजिक/सोशल आणि पर्यावरणीय/एन्विरॉन्मेंटल त्याच जोडीला कॉर्पोरेट, ज्या पद्धतीने चालवली जातात, त्याबद्दलही असंतोष साचू लागला त्याला गव्हर्नन्स इश्यूज म्हटले जाऊ लागले अतिशय स्मार्ट आणि भविष्यवेधी प्रणाली आहे ग्लोबल कॅपिटॅलिझम; भविष्यात आपले मिशन वाटेतच अडवले जाऊ शकते हे जाणून या प्रणालीने मोठे वैचारिक काम करणारे/थिंक टँक्स/संकल्पनात्मक संशोधन प्रकल्प हातात घेतले खालील जंत्री त्याच निरनिराळ्या संज्ञांची आहे/टर्म्स/संकल्पना… नावे मुद्दामहून इंग्रजीमध्ये ठेवली आहेत




Social Impact Investment
Ethical investments
Corporate Social Responsibility
ESG : Environmental, Social, Governance Investments/ funds
Triple Bottom Line
Humane Capital
Responsible Capital
Carbon Credits and Exchanges
Clean Energy
Environment Audit
Environmental Impact Assessment
Women Empowerment
Poverty mitigation
Social sector stock exchanges
Social Audit

ही यादी काही परिपूर्ण नाही; अजून भर तुम्हीच घाला काय झाले किंवा होत आहे… या प्रत्येक फ्रंट वर, काही हिशोब नाही, काही जाबदायित्व नाही; सगळा टोकनिझम, मीडिया मॅनेजमेंट, आपले न्युयल रिपोर्ट्स सजवायचे… एकच उदाहरण घ्या; कार्बन क्रेडिट्स. २० वर्षांपूर्वी एवढा हाइप बनवला; फक्त भारतात शेकडो सल्लागार कंपन्या उभ्या केल्या; स्टॉक मार्केटवर ट्रेडिंग; काय झाले काय त्याचे? काही नाही, हळूच तो विषय स्टेजवरुन काढून घ्यायचा… सर्व प्रकारच्या सामाजिक (म्हणजे नॉन कमर्शियल) इनिशिएटिव्हमधून काय नक्की निष्पन्न झाले? पर्यावरणीय-फ्रंट वर काय मिळवले?

दिवसभर ऐय्याशी, दारूकाम करणारे आणि कारण नसताना मारामाऱ्या / खून करणारे 'फ्युडल लॉर्ड्स' सोडून देऊ, त्यांचे मेंदूच गुडघ्यात; त्यांना जग कसे चालते, हे देखील माहित नाही पण ग्लोबल कॅपिटॅलिझम चालवणारे? ते वेगळे आहेत. केपेबल आहेत.

वैश्विक दृष्टिकोन आहे असा दावा करणारे, जगभर फिरलेले, शिकलेले, पन्नाशी आणि साठीत आलेले ग्लोबल कॅपिटॅलिझम चालवणारे सुटेड बुटेड प्रोफेशनल्स एवढे चालाख, बौद्धिक अप्रामाणिक निपजले आहेत;

जगातील ८०० कोटी लोकांच्या समोर नवनवीन भ्रामक पडदे उभे करत असतात आणि त्या पडद्यामागे त्यांना हवं तेच करतात; या जमातीने मानव जातीचे / पृथ्वीचे प्रचंड नुकसान केलेले आहे…

***…संजीव चांदोरकर*** *(२२ नोव्हेंबर-२०२३)*

---

**काश्मीरही बनणार कॉर्पोरेट सुवर्णलंका!** *…(पान क्र. १ वरुन)*

खरी ग्यानबाची मेख वेगळीच आहे..

काश्मीर सारखं निसर्ग संपन्न राज्य हे जैन, गुजराती, राजस्थानी भांडवलदारांच्या घशात कोंबायचं, ते कारस्थान आहे…

विकासाच्या नावाखाली तिथंही सिमेंटची जंगलंच उभी रहाणार आणि ती उभी करण्यासाठी अदानीला तिथं सिमेंट उत्पादन प्रकल्पासाठी 'विशेष परवानगी' मिळाली तर, आश्चर्य वाटायला नको.

काश्मीर आणि राम मंदिर, हेच २०२४च्या निवडणुकीचा अजेंडा असणार, हे सांगण्यासाठी फार राजकीय जाण असण्याची गरज नाही.

***…रुद्रेश सातपुते***

---

याच निर्णयाचा आधार घेऊन मुंबईदेखील केंद्रशासित केली जाऊ शकते.

निती-आयोगाच्या नावाखाली, प्रशासनाच्या सबबी मांडून सध्याचे वास्तव तेच आहे.

'लोढा'चे मुंबई महानगरपालिकेत कार्यालय, धारावीच्या विकासाचा निर्णय…हे सगळे निर्णय लोकांनी निवडून दिलेले मुंबई महानगरपालिकेचे विधीमंडळ नसताना, का बरं घ्यायची गरज आहे?

त्यात राज्य सरकारच अनधिकृत आणि सुरत रिटर्न आहे.

***…जितू साळवी***

Very correctly said. Supreme Court did not show the guts needed. It is very disturbing, but not very surprising. Democratic forces have a long struggle ahead of us.

***(कॉ. विवेक मॉन्टेरोंचाही (सचिव: सीटू-महाराष्ट्र राज्य) प्रतिसाद….)***

---

SC or for that matter all constitutional entities are already taken over. It is not a question of guts any more. They have themselves become instruments of facilitating the fascist agenda. The facade of working under the constitution is kept while subverting it to make it easier to force the agenda of Hindutva fascism, one nation, one election, unitary state and like their Zionist friends proclaim themselves as the "chosen ones" by proclaiming the nation as "**श्रेष्ठ राष्ट्र**".

The struggle ahead starts with 2024 elections and much beyond on and off the streets. Even if defeated electorally RSS BJP would not give up power easily nor will the infiltrators in all the arms of the state organs as well defined by Marx and Engle's allow any other winning combination to rule.

Fascism is defined as usurpation of state rule by corporates. And Indian and international corporates have taken over the Indian state. Modi rules on their behalf till he is found to be useful. It was the inability of MMS to crush opposition and fulfill their wishes, do their bidding which was responsible for the change of the horse in 2014. The chosen horse was seen as ruthless, pro corporate one in the Gujrat model laboratory, Islamophobia being an additional qualification in their definition of clash of civilizations.

***...Com. Ajit Patil***

*(CPI ML च्या संपादकीय-मंडळाचे सभासद)*

# डायबेटिसला गुलाबजाम चांगला की, जिलबी?

''सर, एक नवा प्रकल्प आपल्या जिल्ह्यात येऊ घातलाय. एक पर्यावरण अभ्यासक म्हणून तुमचे काय मत आहे?'' एका वार्ताहर मित्रांनी मला प्रतिक्रिया विचारली.

त्यावर मी त्यांनाच प्रश्न केला, ''तुमचे काय मत आहे?''

माझ्या या अनपेक्षित प्रश्नाने ते काही क्षण स्तब्ध झाले. व नंतर मला म्हणाले, ''या प्रकल्पामुळे कोणीच विस्थापित होणार नाही. सरकारच्या जमिनीवरच हा प्रकल्प होणार आहे.''

''तुमचा हा मुद्दा विस्थापनाच्या दृष्टिकोनातून झाला. पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून नव्हे,'' मी म्हणालो.

''हा हायड्रो-इलेक्ट्रिक प्रोजेक्ट आहे, त्यामुळे याचा पर्यावरणावर काहीही परिणाम होणार नाही, असे म्हणतात,'' ते म्हणाले.

''कोण म्हणतात?'' मी विचारले.

''प्रोजेक्ट रिपोर्ट म्हणतो!'' त्यांनी उत्तर दिले.

**''जेव्हा तंबाखूमुळे कॅन्सर होतो असे आढळून आले आणि तंबाखूजन्य पदार्थांबाबत प्रश्न निर्माण झाला, तेव्हा तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादकांनी न्यायालये गाठली होती. ते म्हणत होते, तंबाखू दीर्घकाळ खाऊनदेखील कॅन्सर न झालेली कित्येक माणसे आहेत, तेव्हा तंबाखूमुळे कॅन्सर होतो हा दावा खोटा आहे.**

**आजदेखील तंबाखूच्या आहारी गेलेली अनेक माणसे आपले तंबाखूजन्य पदार्थ खाणे चुकीचे नाही, हे पटवून देण्यासाठी दीर्घकाळ तंबाखू खाऊन कॅन्सर न झालेल्या अनेक लोकांची उदाहरणे देतात. तेव्हा तंबाखूजन्य पदार्थ कॅन्सर करणारे आहेत की, नाही यासाठी त्यांच्या उत्पादकांची किंवा त्याचे व्यसन लागलेल्या लोकांची मते विचारात घेता येतील का?**

ज्याला प्रकल्पापासून नफा होतो आणि जो प्रकल्पाच्या उत्पादनाचा व्यसनी आहे, त्याचे मत तटस्थ असणार काय?'' मी विचारले.

''प्रकल्पाचे काहीही दुष्परिणाम नाहीत असे शास्त्रज्ञांनी सांगितले तर ते मान्य करायला नको काय?'' वार्ताहर मित्रांनी प्रश्न केला.

''ज्याच्याकडे पैसे आहेत, तो शास्त्रज्ञ विकत घेऊ शकत नाही का?'' मी विचारले.

''तुमच्या म्हणण्यात तथ्य आहे. पण तज्ञ सोडून मग इतर कोणाचे मत ग्राह्य ठरवायचे?'' त्यांनी विचारले.

''तटस्थ विचार करणाऱ्याचे!'' मी म्हणालो.

''तटस्थ विचार करणारा देखील चुकू शकतो ना?'' त्यांनी विचारले.

''हो. नक्कीच!'' मी असे म्हणताच त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.

मी पुढे म्हणालो, ''पण सावधगिरीचा इशारा पाळल्यानंतर आपल्या लक्षात आले की, धोका नव्हता तर त्यामुळे काही फुकट जात नाही. पण धोका खरंच निघाला आणि आपण काळजी घेतली नाही तर मात्र आपले काही खरे नाही. त्यामुळे सुरक्षिततेच्या बाजूने विचार करणे केव्हाही चांगलेच!

**समजा, मी तुमच्या घरी पाहुणा म्हणून आलो. येताना एक चॉकलेट घेऊन आलो आणि ते तुमच्या मुलाला दिले. ते तुमच्या मुलाच्या हातात देत असतानाच तुम्ही पेपरमध्ये वाचले की काही चॉकलेटमध्ये चॉकलेटची चव मुलांना अतिशय आकर्षक वाटावी म्हणून असे पदार्थ मिसळण्यात आले आहेत की ज्याचा मेंदूवर परिणाम होईल, तर तुम्ही ते चॉकलेट तुमच्या मुलाला खाऊ द्याल का?''**

''नाही. मुलांच्या बाबतीत धोका कसा पत्करता येईल!'' ते म्हणाले.

''समजा, मी ते चॉकलेट मुलांसाठी सुरक्षित असल्याचे दाखले नेटवरून मिळवून दाखवू लागलो, तर तुम्ही ते चॉकलेट तुमच्या मुलाला खाऊ द्याल का?'' मी पुन्हा प्रश्न केला.

''छे! चॉकलेट नाही खाल्ले म्हणून आयुष्य काही फुकट जात नाही,'' ते म्हणाले.

''हेच तुमच्या प्रोजेक्ट आणि शास्त्रज्ञांवरील विश्वास या प्रश्नाचे उत्तर आहे,'' मी म्हणालो.

माझ्या बोलण्यावर ते होकारात्मक हसले.

''आपण आणखी एक प्रश्न विचारात घेऊ. मी तुम्हाला, 'तुम्ही तुमच्या मुलावर ते चॉकलेट खायचे की नाही याची जबाबदारी सोडा' असे म्हणालो तर..?'' मी विचारले.

''तो तर लहान आहे. त्याला आत्ताच्या क्षणाला मजेचे काय वाटते ते तो करणार. तो चॉकलेट खाणार. तो दीर्घकाळानंतर काय होईल याचा विचार करू शकत नाही,'' ते म्हणाले.

माझा मुद्दा त्यांच्या लक्षात येऊ लागला. पण तरीही त्यांना एक प्रश्न होता. ते म्हणाले, ''आपल्या पुढ्यात येणाऱ्या प्रत्येक वस्तूचा, प्रत्येक प्रकल्पाचा तपशील तपासत बसण्यासाठी आपल्याला कामधंदा सोडून तेच करत बसावे लागेल. मग प्रकल्प पर्यावरणपूरक आहे की नाही, हे ठरवायचे कसे?''

''पर्यावरणीय बुद्धिमत्ता वापरून!'' मी म्हणालो.

''म्हणजे?''

**''प्रकल्पासाठी जीवाश्म इंधन लागणार की नाही? प्रकल्पासाठी कच्चा माल म्हणून जे काही लागेल त्यासाठी खाण लागणार की नाही? ज्या जागेवर प्रकल्प उभा करणार तिथे काँक्रिट घालणार की नाही? यासाठी झाडे तोडावी लागणार की नाही? प्रकल्प सुरू असताना त्याचा आवाज, त्याचे ट्रेमर्स याचा परिणाम आजूबाजूच्या जीवसृष्टीवर होणार की नाही? या प्रकल्पाचा लाईफ स्पॅन संपला किंवा त्यातून नफा मिळेनासा झाल्यावर त्या प्रकल्पाच्या कचऱ्याचे बर्डन पृथ्वीवर असणार की नाही? याची उत्तरे तर्काने प्रत्येकजण शोधू शकतो!''** मी म्हणालो.

''पण, असे तपासले तर कोणताच प्रकल्प निसर्गपूरक ठरणार नाही,'' ते म्हणाले.

''होय, ही अतिशयोक्ती वाटत असली तरी हेच वास्तव आहे. फक्त आपण असे आतापर्यंत ऐकलेले नसते म्हणून तसे ऐकताना आपला विश्वास बसत नाही. आपण आपसूक विचार करू लागतो की आपल्या आजूबाजूची माणसे असा अजिबात विचार करत नाहीएत, तेव्हा माझाच विचार चुकीचा असावा. आणि इथेच आपल्याला हे सत्य अतिशयोक्तीपूर्ण वाटायला लागते.

प्रत्येक प्रकल्प जो जीवाश्म इंधन वापरु लागल्यानंतर अस्तित्वात आलाय तो पर्यावरण विघातकच आहे.

**सध्या आपण किती कार्बन डाय ऑक्साईड हवेत सोडत आहोत, माहीत आहे का? वर्षाकाठी तब्बल ४००० कोटी मेट्रीक टनापेक्षा जास्त कार्बन डायॉक्साईड हवेत सोडत आहोत.**


**त्यातील वीजनिर्मिती प्रकल्पांचा वाटा ४३% आहे, गाड्यांचा वाटा ४४% आहे. त्यातही एक धक्कादायक माहीती अशी की आपण ज्या वैयक्तिक चारचाकी गाड्या वापरतो ना, त्या या ४४% पैकी किती कार्बन डाय ऑक्साईडला जबाबदार आहेत माहीत आहे का? तब्बल ४०% कार्बन डाय ऑक्साईडला! आणि बाकी सर्व वाहन प्रकार जसे की मालगाड्या, विमाने, जहाजे इत्यादी मिळून ४% कार्बन डाय ऑक्साईडला जबाबदार आहेत. त्यामुळे, वैयक्तिक चारचाकी वाहने थांबवून लोक जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडे वळतील तर ते पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून मोठे पाऊल उचलणे होईल.**

वीज व वाहने सोडून जे इतर उद्योग कार्बन डाय ऑक्साईड निर्माण करतात त्यात तिसरा मोठा वाटा सिमेंट आणि काँक्रिटीकरणाच्या उद्योगांचा आहे. ते ९ ते १०% कार्बन डाय ऑक्साईडला जबाबदार आहेत.

हे सध्या असलेले वास्तव सांगितले. यात प्रत्येक नवीन प्रकल्प भरच घालण्याचे काम करतो. त्यामुळे पर्यावरणपूरक प्रकल्प असा शब्द वापरणे ही निव्वळ फसवणूक आहे. डॉ. गोलमनच्या भाषेत 'व्हायटल लाय'!

**सध्या चालू असलेले कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्यासाठी कोणकोणते.** *..(पान क्र. १२ वर)*





THE HINDU

# Death of 7 workers in factory blast: NHRC notice to Gujarat govt.

**The Hindu Bureau**
NEW DELHI

The National Human Rights Commission (NHRC) on Monday issued notice to the Chief Secretary and the Director General of Police, Gujarat, calling for a detailed report of the incident in which seven workers died and 24 got injured after a massive blast at a chemical manufacturing factory in Sachin GIDC area of Surat.

Smoke and flame billows from the chemical factory in the Sachin GIDC area of Surat where the fire broke out. ANI

**'Possible negligence'**
The incident took place on November 30th. The commission observed that the reported explosion in the tank filled with inflammable chemicals, *prima facie*, indicates possible negligence on the part of the factory management which requires an investigation.

In their report, which needs to be submitted to NHRC in four weeks, the CS and DGP of Gujarat have to include the status of the FIR registered by the police, medical treatment of the victims and compensation if any, granted to the kin of the deceased persons and the injured.

**Details sought**
The Commission has also asked for details of the action taken against the delinquent persons responsible for the tragedy.




समाजमाध्यमातून साभार

हा घ्या 'गुजराथ-मॉडेल'चा अजून एक नमुना! किती 'गोदी-मिडीया'तल्या वर्तमानपत्रातून व वाहिन्यांवरुन लोकांपर्यंत पोहोचवली गेली? रासायनिक उद्योगांमध्ये, अपघातांची मालिका सुरुच आहे. 'आऊटसोर्सिंग'च्या शोषणकारी नव-भांडवली तंत्रातून छोट्यामोठ्या वर्कशॉप्समधील शेकडो-हजारो अपघातांची ना कुठली नोंद, ना मरणाऱ्या किंवा जखमी होणाऱ्या 'कामगार' नावाच्या आधुनिक गुलामांची कुणाला पर्वा!

...औद्योगिक-सुरक्षिततेचे अतिशय खर्चिक व काटेकोर नियम पाळण्यात अमानुष हेळसांड संबंधितांकडून होत असल्यानेच, ती मानवनिर्मित अपघातांची मालिका यासाठी थांबायला तयार नाही कारण, मरणारे सगळेच 'कंत्राटी-कामगार' असतात, ज्यांना नसतं कुठलं कायदेशीर संरक्षण, ना कुठल्या युनियनचं भक्कम पाठबळ आणि आपल्या देशातलं कामगारखातं, म्हणजे सगळा आनंदीआनंदच असतो.

त्यामुळेच, कंत्राटी-कामगाराचं (खरं म्हणजे, गुलामांचं) अपघाती मरण, ही भांडवलदारवर्गासाठी अगदी स्वस्तात व कुठलीही बोंबाबोंब न होता...कुठली कायदेशीर सजा तर सोडाच; साधा त्रासही न होता, चटावरच्या श्राद्धासारखी अतिशय स्वस्तात उरकण्याची बाब होय! पोलिसांसह संबंधित सरकारी अधिकाऱ्यांचे हात ओले केले की, झालं!

**ये कोरी बकवास है कि नीची जात के हिंदुओं को तलवार की नोंक पर मुसलमान बनाया गया. वे ज़मींदार और पुरोहित से मुक्ति पाने के लिए मुसलमान बने**
**– स्वामी विवेकानंद**
**(कलेक्टेड वर्क्स; खंड 8; पृष्ठ 330)**



**अंधभक्तांच्या 'संघीय' भंपक धारणांचा आणि सपक युक्तिवादाचा, तकलादू पत्त्याचा बंगला, स्वामी विवेकानंदांच्या या प्रखर प्रतिपादनातून खरंतरं साफ कोसळून पडायला हवा!**

## डायबेटिसला गुलाबजाम चांगला की जिलबी? *...(पान क्र. ११ वरुन)*

**आज अस्तित्वात असलेले प्रकल्प बंद करायचे आणि कार्बन डाय ऑक्साईड पचवू शकणारी नैसर्गिक यंत्रणा म्हणजे प्रत्येक हिरवे पान आणि समुद्रातील फायटोप्लेन्कटन कसे जिवंत राहील व वाढेल, यासाठी शर्थ करायची सोडून, आम्ही कार्बन डाय ऑक्साईडच्या वाढीत भर घालण्याचेच उद्योग करत आहोत. आणि, आमचा वाद काय चालू आहे? कोणता प्रकल्प कमी भर घालतो आणि कोणता जास्त यावर. हे म्हणजे इन्सुलिनवर असलेल्या डायबेटीक पेशंटने जिलबी खाणे जास्त सुरक्षित की गुलाबजाम असा प्रश्न उपस्थित करून वाद घालण्यासारखे आहे,''** मी म्हणालो.

''तुम्ही उदाहरणे दिलीत ती ठिक आहेत. पण तुमच्या पद्धतीने विचार केला तर विकास होणार कसा?'' त्यांनी विचारले.

''जगाची अध्यात्मिक भूमी मानल्या गेलेल्या भारतात हा प्रश्न ऐकू येतो, याचेच मला आश्चर्य वाटते.

**सुखसाधनांची रेलचेल हा ना भौतिक विकास आहे, ना आध्यात्मिक विकास आहे. तुमच्या मुलाला चॉकलेट, जंकफूड, आईस्क्रीम खायला मिळाले नाही तर ते त्याचे मागासलेले बालपण असेल का?**

सुखसाधनांच्या रेलचेलीने आमचे आयुष्य जुन्या पिढ्यांपेक्षा अधिक समृद्ध झाले आहे का? उलट आधुनिक जगात मनोविकारतज्ज्ञांची गरज वाढत चालली आहे, हे आपल्यातील प्रत्येकाला दिसतेय,'' मी म्हणालो.

''खरे आहे तुम्ही म्हणता ते. पण तुम्हाला विकास विरोधक म्हणतील,'' तो काळजीच्या सुरात म्हणाला.

''पण त्यामुळे सत्य थोडेच बदलणार आहे. व्यसनी माणसाने त्याच्या व्यसनाविषयी कितीही युक्तीवाद केला तरी त्याचे वागणे त्याला व व्यसनी नसलेल्या त्याच्या कुटुंबालाही रसातळाला नेतेच ना. त्यामुळे व्यसनी माणूस मला शिव्या देईल या भितीने मी गप्प रहाण्याने ना त्याचे व्यसन सुटणार, ना त्याचे कुटुंबीय संकटात पडण्यापासून वाचणार! पण त्याचे मद्यपान हे सोशल ड्रिंकींग राहिलेले नाही, ते त्याच्यासह त्याच्या कुटुंबाला रसातळाला नेणारे व्यसनच आहे, हे मी त्याच्या कानीकपाळी घालतच राहीलो तर तो बाहेर निघण्याच्या शक्यता आहेत. दारू, सिगारेट वगैरेचे अनेक व्यसनी धडपडत धडपडत का होईना त्यातून बाहेर पडताना मी पाहिलेत. त्यामुळे मला ही दाट आशा आहे की वस्तूंच्या रेलचेलीत सुख शोधण्याचे व्यसन लागलेली मंडळीदेखील सततच्या कानीकपाळी ओरडत राहील्याने बाहेर पडण्याचा प्रयत्न करतील,'' मी म्हणालो.

***...डॉ. रुपेश पाटकर***

# अडॉल्फ हिटलर का गुरु... ‘बेनेटो मुसोलिनी’ अभी जिंदा है और ‘काली टोपी’ पहना है...!!!

शिवतीर्थावरील शिवसेनेच्या पारंपरिक ‘दसरा-मेळाव्या’त, आपल्या आक्रमक शैलीतील भाषणात मा. उद्धवजींनी ज्या ‘काळ्या टोपी’चा उल्लेख केला (यापूर्वीही, छत्रपती संभाजीनगरमधील भाषणात, ‘‘संघाची टोपी ‘काळी’ का, ‘भगवी’ का नाही?’’, असा तो प्रकर्षाने त्यांच्याकडून झाला होताच)...याचं फार मोठं औचित्य आपल्याला ‘‘4PN News Network’’तर्फे प्रसारित करण्यात आलेल्या, वरील अतिशय महत्त्वपूर्ण अशा व्हिडीओतून, वाचकांच्या ध्यानात यावं!

...खरंतरं, बेनेटो मुसोलिनीच्या ‘काळी टोपी, हाफ पँट’च्या ‘काळ्याकुट्ट’ कारकीर्दीवर ‘धर्मराज्य पक्षा’च्या बिरुदाखाली संदेशात्मक काही लिहावंच... असं मनात योजित असतानाच, हा सर्वांगसुंदर असा प्रभावी व्हिडीओ, संजय शर्मा यांच्या ‘‘4PN News Network’’च्या अजय शुक्ला यांनी सादर करुन फार मोठं प्रबोधनात्मक कार्य पार पाडलंय, यात तिळमात्र शंका नाही. त्या उभयतांचं व त्यांच्या पत्रकार-चमूचं मनापासून कौतुक व आभार!

हा व्हिडीओ, आपण जरुर पहावाच; पण, त्याहीपेक्षा नवतरुणपिढीने त्याचा अभ्यास करावा व स्वतःच्या वैचारिक-बौद्धिक कुवतीनुसार त्यावर निर्णय घ्यावा, ही नम्र विनंती.

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)





How Can PM Modi Fight Corruption With Ajit Pawar On His Side?: Congress' Rashid Alvi

‘राफेल’च्या गैरव्यवहाराला ‘तेल’ कुणाचं लाभलं, ‘तूप’ कोणी पळवलं... ‘‘दाखवा, अर्जुनाला तपासकामावर प्रकाश पाडू शकणारा सूर्य आणि म्हणावं, घे वेध, आता भ्रष्टाचारी जयद्रथाचा’’, आहे हिंमत ‘दिल्लीश्वरां’ची...??? फुकाच्या भ्रष्टाचार संपवण्याच्या बाजारगप्पा मारायच्या आणि ७० हजार कोटींच्या सिंचन-घोटाळेवाल्यांसकट तमाम भ्रष्टाचार्यांना, राजकीय-स्वार्थापोटी आपल्या मांडीवर जोजवत बसायचं...थूऽऽत तेरी!

# काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार, संपादक-पत्रकार व लेखक-विचारवंत

## सर्वश्री कुमार केतकर यांच्या समाजमाध्यमातील मूळ इंग्रजी-संदेशाचा मराठी अनुवाद!




**‘भारत छोडो’ दिनानिमित्ताने ‘‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने (RSS) त्या आंदोलनाला विरोध करुन, संघ त्यापासून कसा अलिप्त राहीला होता’’, याचं आपल्याला हटकून स्मरण झाल्याशिवाय रहात नाही. ‘हिंदू महासभा’ तर, त्याहीपेक्षा एक पाऊल पुढे गेली होती आणि २६ जुलै-१९४२ रोजी, फजलूल हक यांच्या मंत्रिमंडळात मंत्रीपद भूषवणाऱ्या शामाप्रसाद मुखर्जी यांनी ब्रिटीशांना आग्रहपूर्वक कळवताना बंगालचे राज्यपाल (गव्हर्नर) जॉन हर्बर्ट यांना स्वतःहून लिहीलं होतं की, ‘‘युद्धसमयी जनतेच्या भावना भडकावून जर कोणी, अशांतता व असुरक्षितता निर्माण करत असेल तर, त्याला सरकारने प्रखर विरोध केला पाहीजे!’’**

एवढंच नव्हे; तर, ‘‘आपला (ब्रिटीशांचा) एक मंत्री म्हणून, या कसोटीच्या काळात आपल्याला अगदी अंतःकरणपूर्वक सहकार्य द्यायला आणि माझ्या प्रांताची सेवा मी एका पायावर करायला तयार आहे’’, असं ठाम वचन देत त्यांनी ब्रिटीश गव्हर्नरप्रति आपली एकनिष्ठता जगजाहीर केली होती.

तुरुंगातून सुटका व्हावी म्हणून ब्रिटीशांकडे दयायाचनेची भीक मागणाऱ्या आपल्या सावरकरांसारख्या नेत्यापेक्षा शामाप्रसाद काही फार उजवे नव्हते... हे, त्या पत्राच्या उर्वरित भागांवरुन निःसंशयरित्या समजतं.

‘‘काँग्रेसने प्रयत्नांची शिकस्त केली तरी, ही (भारत छोडो) चळवळ, संपूर्णया अयशस्वी ठरेल, अशाच पद्धतीने बंगाल-प्रांताचा प्रशासकीय कारभार चालवला गेला पाहीजे’’, असं ठाम प्रतिपादन करत, त्यांनी त्यावर जोरदार भर दिला.

**‘‘ज्या स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने चळवळ सुरु केलीय, ते याआगोदरच जनतेच्या प्रतिनिधींच्या हक्काचं झालेलं आहे... भारतीयांनी ब्रिटीशांवर विश्वास ठेवलाच पाहीजे’’, असं, आमचे अतिशय जबाबदारीने कारभार करणारे मंत्री, जनतेला जाऊन सांगतील, असंही त्यांनी गव्हर्नरला आश्वस्त केलं होतं.**

*(काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार, संपादक-पत्रकार व लेखक-विचारवंत सर्वश्री कुमार केतकरसाहेबांच्या समाजमाध्यमातील मूळ इंग्रजी-संदेशाचा, ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष, राजन राजे यांनी केलेला मराठी अनुवाद!)*

मरणारे ऋग्ण मेले, कोवळे जीव मारले गेले (आपण फक्त, हतबलपणे संख्या मोजत रहायची)...बॉम्बफेक अथवा मिसाईलफेक करुन त्यांना मारताना, ज्यांच्या अंतःकरणाला कुठला विचार शिवला नाही, ज्यांचं अंतःकरण किंचितही द्रवलं नाही... ते इस्रायली नेत्यान्याहू-सरकार, गाझा-इस्पितळावरील हल्ल्यानंतर ''तो मी नव्हेच'', या बदमाषीपूर्ण भांडवली-शैलीत... ''तो हल्ला करणारे, आम्ही नव्हेच'' असं, गेंड्याची कातडी पांघरुन निगरगट्टपणे जगभरच्या प्रचार-प्रसार माध्यमांतून बोंबलत सांगू लागलेत...!!!

वरील खोटा दावा करताना, बदमाषी करण्याच्या नादात 'तुर्किश टाईमझोन'मधली वेळ चुकल्यामुळे, झालेली चूक सुधारण्यासाठी, तो गाझा-इस्पितळावरील हल्ल्याचा व्हिडीओ, इस्रायलकडून घाईघाईने 'डिलीट' करुन वेळ सुधारुन पुन्हा नव्याने तो टाकण्यात आला... हे ही आवर्जून लक्षात घेतलं पाहीजे.

गाझा-इस्पितळावरील इस्रायली-नृशंस हल्ला, "Fact OR Fiction" जे काही असेल ते, असो... पण, मरणारी माणसं, क्रूरपणे मारले गेलेले कोवळे जीव, ही कुठली 'Fiction' नसून अंतःकरण पिळवटून टाकणारी 'Fact' आहेच! जे काही घडलंय, पुढे घडणार आहे... ते इस्रायली-ज्यूंच्या आजवरच्या (विशेषतः, विसाव्या शतकाच्या मध्यापासूनच्या, इस्रायल-राष्ट्र निर्मितीच्या आंतरराष्ट्रीय-कांडानंतर) अमानवी-क्रूर वसाहतवादी मनोवृत्तीतूनच घडतंय, हे इस्रायली-सरकार नाकारु शकेल?

पॅलेस्टाईनमध्ये मोठ्या संख्येने असणारी तेथील मूळची ज्यू (यहुदी) लोकंदेखील,



बाहेरुन (युरोप-अमेरिका-इंग्लंडमधून) येऊन इस्रायल-राष्ट्र पॅलेस्टाईनभूमिवर जबरदस्तीने वसवणाऱ्या 'गोऱ्या कातडी'च्या ज्यू लोकांविषयी अत्यंत कडवटपणे बोलतात व अपुऱ्या संसाधनांनिशी लढणाऱ्या पॅलेस्टाईन अरबांना मनापासून संपूर्ण पाठींबा देतात, हे विशेषच.

आधुनिक भांडवली-व्यवस्थेत केल्या जाणाऱ्या प्रचारतंत्रावर, विविध माध्यमांतून पसरवल्या वा पेरल्या जाणाऱ्या बातम्यांवर, मग त्या शासकीय बाबीसंदर्भात असो वा 'कॉर्पोरेटीय क्षेत्रा'संदर्भात, जराही विश्वास ठेवणं...अलिकडच्या काळात खूपच कठीण होत चाललंय (हेच तंत्र वापरुन, भारतातल्या मूठभर वर्णवर्चस्ववादी-शोषक वर्गाने, पिढ्यानपिढ्या बहुजन समाजाला अज्ञान व अंधश्रद्धेत ढकलून, त्यांचं आजवर हजारो वर्षे शोषण केलेलं आहे, त्यांच्यावर अन्याय-अत्याचार केलेले आहेत... ज्या वर्गाचं प्रतिनिधित्व, आजचा संघ आणि भाजपा करतो... त्यातूनच, इस्रायलला त्यांचा पाठींबा का, हे ही आकळतं)... भारतातल्या 'गोदी-मिडीया'वर चारपाच वर्षांचं शेंबडं पोरदेखील विश्वास ठेवायला तयार नाही, इतकी वाईट परिस्थिती आहे, आपल्या देशात.

एका बाजुला, हे भयंकर महाभारत घडत असतानाच, 'कतार' नावाचा अरब देश, ब्रिटनशी (ज्याने, पॅलेस्टाईनभूमिवर क्रौर्यपूर्ण हडेलहप्पीने इस्रायल-राष्ट्रनिर्मिती करण्यात प्रमुख भूमिका निभावली होती) तब्बल २७ वर्षांचा गॅस-पुरवठ्याचा करार करतोय... ऐकायला, वाचायला कसं वाटतं? भांडवली-व्यवस्थेतल्या आत्यंतिक स्वार्थी विचारसरणीत 'माणुसकी किंवा नितीमत्ते'ला बिलकूल थारा नसतो आणि नसतो थारा, कुठल्याही मानवी-संवेदनांना; तर, भूतदयेला कुठून असणार...???

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***



**जालन्यात मराठा आंदोलकांवर पोलिसांचा भीषण लाठीचार्ज!**



**''हिंसक प्रकार घडल्यास पोलिस बघ्याची भूमिका घेणार नाहीत...शांततापूर्ण आंदोलने जरुर करावीत, मात्र महाराष्ट्रात हिंसेला अजिबात थारा देणार नाही...''**
**इति, देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री)**

## 'हिंडेंनबर्ग' से लेकर 'फिनान्शियल टाईम्स' तक, छपी छुपी कहानी...



सर से उपर हो गया हो पानी, नाम उसका 'गौतम अदानी'!

पीत-पत्रकारितेच्या बाजारात बोली लावून 'मेंदूविक्रय' (देहविक्रयापेक्षा हजारपट वाईट) करणाऱ्या, 'गोदी-मिडीया'तल्या एकापेक्षा एक सरस 'रबिश (Rubbish) कुमारां'ना पुरुन उरणार्‍या 'रविश कुमारां'चा, गौतम अदानीवर निर्णायक प्रहार करणारा व्हिडीओ जरुर बघाच...

***...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)***

## Contemporary Dystopia....आज का जमाना...!!!



जैसे पहलवानोंने, पहलवानी छोड दी...पत्रकारों, पत्रकारिता छोड दो!

...एक जमाना था, जब सरकार पत्रकारों से डरती थी और आज पत्रकार, सरकार से सहमे हुए... क्योंकी, आज पत्रकारिता में 'रवीशकुमार' और 'पुण्यप्रसून' की कम, मगर 'रबीशकुमार तथा 'पापीप्रसून' (अर्णव, रजत, रोहित, सुधीर, श्वेता, अंजना, बरखा) की पैदाइश बहोत ज्यादा हुई है!



भांडवली-व्यवस्थेच्या दमनकारी दबावाविरुद्ध; तसेच, कंपनी-दहशतवादाविरोधात (Corporate-Terrorism) छाती पुढे काढून तडफेनं व एकजुटीने संघर्षरत रहात... तप्त मुशीतून बाहेर पडलेल्या सोन्यासारखं तावूनसुलाखून निघण्याऐवजी, मराठी कामगार... आपापसात फाटाफूट करत व ''कामगारच कामगाराचा शत्रू बनत''... गद्दारी व पळपुटेपणा करताना दिसतोय... दारुची बाटली आणि धर्मसंप्रदायांची 'अफूची नशा' सेवन करत, ''नरेचि केला हीन किती नर'', याचा अवघ्या कामगार-विश्वाला कंपन्या-कंपन्यांमधून परिचय देतोय, या दुर्दैवाला काय म्हणावं...???

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाजपशासित राज्यांमध्ये दिलेल्या आश्वासनानुसार, महाराष्ट्रातदेखील पेट्रोल व डिझेलचे दर तात्काळ कमी करण्यात यावेत!

## ‘धर्मराज्य पक्षा’ची एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांकडे आग्रही मागणी...

**ठाणे :** नुकत्याच देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. त्यापैकी राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले आहे. दरम्यान, **आपल्या प्रचारादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, राजस्थानातील पाली येथे घेतलेल्या प्रचारसभेत, राज्यातील तत्कालीन काँग्रेस सरकारावर इंधन दरवाढीबाबत जोरदार टीका केली होती. त्यावेळी त्यांनी बोलताना, पेट्रोल व डिझेलचे दर शंभर रुपयांच्या पलीकडे गेले असून, यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडले असल्याचे वक्तव्य केले. तसेच, भाजपशासित राज्यांमध्ये मात्र, पेट्रोल व डिझेलचे दर हे, ९७ रुपयांवर स्थिर असल्याचा दावा केला होता. यामध्ये त्यांनी उत्तरप्रदेश, गुजरात आणि हरियाणा या राज्यांची उदाहरणे दिली होती. वास्तविक पाहता, महाराष्ट्रात विद्यमान शिवसेना (शिंदे गट) आणि भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झालेले असतानाही, महाराष्ट्र राज्यात मात्र, पेट्रोल व डिझेलचे दर हे, शंभरीच्या पार पोहोचलेले असतानाही, पंतप्रधानांनी महाराष्ट्राचा उल्लेख टाळला होता. कदाचित महाराष्ट्रात पेट्रोल–डिझेलचे वाढलेले दर पंतप्रधान नरेंद्र मोदींना ज्ञात नसल्याने, त्यांनी त्याकडे इतके गांभीर्याने पाहिले नसल्यामुळेच, पंतप्रधानांकडून अनावधानाने महाराष्ट्रातील इंधन दरवाढीबाबतचा संबंधित उल्लेख राहून गेला असल्याचे गृहीत धरुन, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री**



**व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपहासात्मक पत्र लिहून, भाजपशासित राज्यांप्रमाणेच महाराष्ट्र राज्यातील, शंभरीच्या पार गेलेली पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ तात्काळ कमी करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली आहे.**

दरम्यान, राजस्थानात भाजपचे सरकार स्थापन झाल्यास, पेट्रोल व डिझेलचे दर त्वरित कमी करुन, गरीब आणि मध्यमवर्गीयांना दिलासा देण्यात येईल असे आश्वासन, नरेंद्र मोदी यांनी, आपल्या प्रचारसभेत दिले होते. त्यानंतर, पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांपैकी, तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले आहे. याच पार्श्वभूमीवर, ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, **“पंतप्रधानांच्या दाव्यानुसार, भाजपशासित राज्यांमध्ये पेट्रोल–डिझेलचे दर, अवघे ९७ रु. लिटर इतके असल्याच्या वक्तव्यावर विश्वास ठेवून, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या, आश्वासक आणि कर्तव्यदक्षतेच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातदेखील पेट्रोल व डिझेलचे दर तात्काळ कमी करण्यात यावेत आणि राज्यातील गरीब व मध्यमवर्गीय जनतेला दिलासा देण्यात यावा. मुळात, महाराष्ट्र सरकारच्या एक वर्षाच्या कालावधीत, राज्याच्या सचिवांनी किंवा संबंधित विभागाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी, भाजपशासित राज्यांप्रमाणेच, महाराष्ट्रातही इंधन दरवाढ कमी करण्यासंदर्भातील सूतोवाच करणे आवश्यक होते; मात्र, दुर्दैवाने विद्यमान महाराष्ट्र शासन व केंद्र सरकारचे लक्ष महाराष्ट्राकडे गेले नसावे”** अशी उपरोधिक भाष्य करुन, त्यासाठी आमच्यासारख्या छोट्या मात्र, सर्वसामान्यांसाठी लढणाऱ्या ‘धर्मराज्य पक्षा’च्या लक्षात ही बाब आली असल्याने, त्याकडे आपण प्राधान्याने लक्ष द्यावे, असे स्पष्ट करीत, सध्याच्या महागाईच्या काळात, सर्वसामान्य महाराष्ट्रीय जनतेचे कंबरडे पार मोडलेले असून, वाहतूक व्यवस्थेवर इंधनवाढीचा थेट प्रभाव पडल्यामुळेच महागाई वाढती राहिलेली आहे. परिणामी, त्याची झळ ही सर्वसामान्य करदात्या–कष्टकरी नागरिकांना सोसावी लागत आहे. हीच झळ दूर करण्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आश्वासनाची पूर्ती महाराष्ट्रात करणे क्रमप्राप्त असल्याने, राज्यातील पेट्रोल व डिझेलचे दर तात्काळ कमी करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे उपाध्यक्ष नितीन देशपांडे यांनी, आपल्या पत्रात शेवटी केली आहे.

---

खाऊन खाऊन माजलेत ४० बोके,
वरतून म्हणतात सगळंच ओके!
बोला, हायेत कुठं ते ५० खोके...
डचमळत्या ट्रेनच्या धडाला
‘ट्रिपल-इंजिन’चे डोके!
‘बारामती’ वाले के गले पडा,
नागपूरकर दूजा,
आधी होता ‘खरबूजा... मग,
‘सरकारपाड्या’ टरबूजा!
‘कले कले’ने नाय, ‘किलो किलो’ने
वाढणं काय ते थांबेच ना...
दादांची रमी, दिल्लीवाल्या ‘जोकर’
वाचून काहीकेल्या जुळेच ना!
...गद्दारीचा भोज्या, भोज्यातून
‘मंत्रीपद’,
आलं आलं जवळ ‘बारामती स्टेशन’...
म्होरक्याला लईच आलंय बाय, ‘फूल
टू टेंशन’...!!!

*...राजन राजे*
*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

Tweets Tweets & replies Media

**Rajan Raje - राजन राजे** ... · 9s
तिसरा 'अग्निपथावरील अग्निवीर' मृत्यूपंथावर..यावेळेस, २०वर्षीय अपर्णा नायर, नौदलातील नवतरुणी! पंजाबचा अमृतपालसिंह (त्यानेही, आत्महत्या केली म्हणे) आणि सियाचेनमध्ये शहीद महाराष्ट्राचा अक्षय गावटे आणि यापैकी कोणाच्याही कुटुंबियांना ना निवृत्तीवेतन, ना माजी लष्करी-जवान म्हणून फायदे!

Tweets Tweets & replies Media

**Rajan Raje - राजन राजे** ... · 7s
फुसक्या बाराने धैर्य गळाले, तथाकथित 'हिंदुत्व'वादी खासदार संसद सभागृहातून पळाले...पिवळा धूर पाहताच, 'पिवळी' झाली!
...पण, राहुल गांधी 'बाजीप्रभू देशपांड्यां'सारखा अगदी ठाम निर्भयपणे सभागृहात उभा राहीला !!
ही आंतरिक-ताकद असते सत्याची, हे आंतरिक सामर्थ्य असतं, न्यायपूर्ण वर्तनाचं !

**Prashant Bhushan**
@pbhushan1
#RafaleScam "Indian govt of PM Modi is refusing to comply with a request for international cooperation made by French judges. The two investigating magistrates want access to key documents as part of their probe into alleged corruption over the sale of 36 Dassault-built Rafale... twitter.com/i/web/status/1...

**दुनिया का सबसे बड़ा मजाक चार वर्ण और ६७४३ जातियों में बांटने के बाद कह रहे हैं, हिंदुओं एक हो जाओ।**



‘फॉक्सकॉन, एअरबस’सारखे तुलनेनं कमी प्रदूषणकारी प्रकल्प गुजराथला आणि जैतापूर अणुविद्युत आणि नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पासारखे... भयंकर प्रदूषणकारी व अंति विनाशकारी प्रकल्प, मात्र महाराष्ट्रात... शिवाय, केवळ, धनदांडग्या गुजराथ्यांच्या आर्थिक-हिताची असणारी आणि नजिकच्या भविष्यात मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची, अंगभूत महाराष्ट्र-घातकी क्षमता असणारी ‘बुलेट-ट्रेन’, धावणार महाराष्ट्राच्या छाताडावर... ‘ये तो चालसे नथी’, एकनाथराव-देवेंद्रजी!

...राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...)

# ठाणे शहरातील झेब्रा क्रॉसिंग, पांढऱ्या-लाल रंगाऐवजी, काळ्या पांढऱ्या रंगातच रंगविण्याची 'धर्मराज्य पक्षा'ची मागणी...

**ठाणे :** गेल्या काही दिवसांपासून ठाणे शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवरील झेब्रा क्रॉसिंग हे, मूळ काळ्या-पांढऱ्या रंगाऐवजी, पांढऱ्या-लाल रंगात रंगविण्यात येत आहेत. यासंदर्भात ठाणे वाहतूक शाखा आणि ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडून, वाहनचालक व सर्वसामान्य नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आलेली नाही. अशाप्रकारचा महत्त्वाचा बदल करण्यापूर्वी, त्याबाबतची सूचना परिपत्रकाद्वारे सार्वजनिकरित्या प्रसिद्ध केली जाते. मात्र, तशी कोणतीही माहिती वाहतूक शाखा व ठाणे महापालिका प्रशासनाकडून देण्यात आलेली नसल्याने, वाहनचालक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. मुळात 'इंडियन रोड काँग्रेस'च्या (आयआरसी) नियमावलीनुसार, संपूर्ण भारतातील रस्त्यांवरील झेब्रा क्रॉसिंग हे, काळ्या-पांढऱ्या रंगातच रंगविण्यात येतात. परंतु, ठाणे शहरातील प्रमुख रस्त्यांवर पांढऱ्या-लाल रंगात झेब्रा क्रॉसिंग रंगविण्यात आल्यामुळे, ठाणे वाहतूक शाखा आणि ठाणे महापालिका प्रशासन यांनी, 'आयआरसी'च्या नियमांना हरताळ फासला आहे की काय? असा प्रश्न 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने उपस्थित करण्यात आला आहे. वास्तविक पाहता, मूळ काळ्या-पांढऱ्या रंगाऐवजी, पांढऱ्या-लाल रंगात झेब्रा क्रॉसिंग रंगविण्यामागील प्रशासनाचा उद्देश स्पष्ट होत नाही. कदाचित ठाणे महानगरपालिका आयुक्तांच्या 'बदलते ठाणे' या संकल्पनेतील हा नवा उपक्रम तर नसावा ना? असा भाबडा प्रश्नदेखील निर्माण झाल्याचे 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, ठाणे वाहतूक शाखेचे उप-आयुक्त विनयकुमार राठोड आणि ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांना संयुक्तपणे लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, झेब्रा क्रॉसिंगच्या या बदलत्या रंगसंगतीमुळे वाहनचालकांचा आणि रस्ता ओलांडणाऱ्या पादचाऱ्यांचा गोंधळ उडून, अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या कित्येक वर्षांपासून काळया-पांढऱ्या रंगातील झेब्रा क्रॉसिंग अस्तित्वात असल्यामुळे, वाहनचालक आणि पादचाऱ्यांना ते सोयीचे व सवयीचे झालेले आहे. मात्र, आता पांढऱ्या-लाल रंगामुळे, यापुढे त्याला झेब्रा क्रॉसिंग तरी का म्हणावे? असा प्रश्न उपस्थित झाल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. ठाणे शहरातील वाढती वाहतूक आणि पार्किंग समस्या लक्षात घेता, त्यावर ठोस उपाययोजना करण्याऐवजी, रस्त्यांवरील झेब्रा क्रॉसिंगचा रंग बदलून, वाहतूककोंडी सुटणार नाही. मध्यंतरीच्या काळात टोव्हींगच्या माध्यमातून आर्थिक घोटाळा उघड झाला होता. खासगी



टोव्हींग व्हॅन ठेकेदार आणि वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून, नो पार्किंगध्ये उभ्या असलेल्या वाहनांवर कारवाई करताना, होणारा आर्थिक गैरव्यवहार 'धर्मराज्य पक्षा'च्या माध्यमातून चव्हाट्यावर आणण्यात आला होता. ठाणे शहरातील वाढती वाहनसंख्या लक्षात घेता, आजही वाहनांसाठी पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली नाही. वाहतूककोंडी ही तर आता नित्याचीच बाब झालेली आहे. या प्रमुख समस्यांवर तोडगा काढण्याऐवजी, ठाणे वाहतूक शाखा आणि ठाणे महानगरपालिका प्रशासन मात्र, झेब्रा क्रॉसिंगचा रंग बदलण्यात धन्यता मानत असेल तर, यापेक्षा हास्यास्पद बाब दुसरी असूच शकत नाही. याबाबत ठाणेकर नागरिक व वाहनधारकांमध्ये संभ्रमावस्था असून, कोणतेही ठोस कारण नसताना, निव्वळ ठाणे शहर रंगीत करण्याच्या उद्देशाने, झेब्रा क्रॉसिंगची रंगरंगोटी करण्यात आलेली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ज्याप्रमाणे, ठाणे शहरातील वाहतूककोंडी सुटण्यासाठी, तथाकथित सुमित बाबाच्या सल्ल्यानुसार, वाहतुकीत बदल करुन आणि गैरसोयीचे रस्ता दुभाजक उभारुन, ठाणेकरांचा व वाहनचालकांचा रोष निर्माण झाला होता, तोच प्रकार या पांढऱ्या-लाल रंगाच्या झेब्रा क्रॉसिंगमुळे पुन्हा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काळ्या-पांढऱ्या झेब्रा क्रॉसिंगऐवजी, पांढऱ्या-लाल रंगाचे झेब्रा क्रॉसिंग रंगविण्यात यावेत ही आयडियाची कल्पना, त्याच तथाकथित सुमित बाबाच्या सुपीक डोक्यातून तर प्रसवलेली नाही ना? असाही खोचक प्रश्न पत्रातून विचारण्यात आला असून, या सर्व प्रश्नांचे, शंकांचे आणि पांढऱ्या-लाल रंगाच्या झेब्रा क्रॉसिंगमुळे निर्माण झालेल्या संभ्रमाचे निराकरण त्वरित दूर करण्यात येऊन, 'इंडियन रोड काँग्रेस'च्या (आयआरसी) नियमावलीप्रमाणे, मूळ काळया-पांढऱ्या रंगातच, ठाणे शहरातील सर्व झेब्रा क्रॉसिंग रंगविण्यात यावेत, अशी आग्रही मागणी महेशसिंग ठाकूर आणि नरेंद्र पंडित यांनी, ठाणे वाहतूक शाखेचे उप-आयुक्त व ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात शेवटी केली आहे.


मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित

'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!



राजन राजे
(अध्यक्ष)





महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)